रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १४३ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २१ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹

## बँक कर्मचारी जाणार संपावर

**मुंबई :** राज्यात निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला ब्रेक लागला आहे. यादरम्यान आता लाडकी बहीण योजनेवरुन बँक कर्मचाऱ्यांनी संपाचं हत्यार उपसलं आहे. महाराष्ट्रात बँक कर्मचाऱ्यांनी १६ नोव्हेंबर रोजी संपाची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लागू झाल्यानंतर ती राबवताना सुरक्षित वातावरण मिळत नसल्याचं बँक कर्मचाऱ्यांनी म्हटलं आहे. तसंच लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांकडून बँक कर्मचाऱ्यांचा झालेला छळ आणि हल्ला यामुळे हे संपाचं हत्यार उचलण्यात आल्याचं सांगण्यात आलं आहे. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने हा संप पुकारला आहे.

## राज्यात झिकाचे १३८ रुग्ण

**पुणे :** झिका हा डासांमार्फत पसरणारा एक विषाणूजन्य आजार आहे. जूनमध्ये पुण्यात पहिला रुग्ण आढळल्यावर त्यानंतर झिकाचे रुग्ण पिंपरी चिंचवड, अहिल्यानगर, सोलापूर, कोल्हापूर, दादर, सांगली या ठिकाणी देखील आढळून आले. आतापर्यंत राज्यात १३८ रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी सर्वाधिक रुग्ण पुण्यात असून त्यांची संख्या १०८ इतकी आहे. त्यापैकी पिंपरी-चिंचवडमध्ये ६, पुणे ग्रामीणमध्ये ९ रुग्ण आहेत. पुणे शहरात आतापर्यंत १ लाख ७१ हजार घरांची तपासणी केली असून ७९८ जणांचे रक्त नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत. त्यापैकी ७१५ नमुने हे गर्भवती महिलांचे असून ४५ गर्भवती पॉझिटिव्ह आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

# गाडीने महिलेला चिरडले

## हरिहरेश्वर येथील घटना, महिलेचा मृत्यू

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**हरिहरेश्वर येथ आलेल्या मद्यधुंद पर्यटकांनी महिलेला गाडीखाली चिरडल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि.२०) पहाटे घडली. या मद्यधुंद पर्यटकांनी महिलेला गाडीखाली चिरडलं आणि पलायन केलं. निवासासाठी रूम न दिल्याने ममता होम स्टेचे मालक अभी धामणस्कर आणि पर्यटकांमध्ये वाद झाला. या क्षुल्लक वादातून पर्यटकांनी महिलेच्या अंगावर गाडी घातली. यात महिलेचा मृत्यू झाला.**






श्रीवर्धन तालुक्याकडे दिवसेंदिवस पर्यटकांचा ओघ वाढला आहे. श्रीवर्धन तालुक्यात फिरायला येणाऱ्या पर्यटकांमध्ये पुण्यातून येणारे पर्यटक जास्त आहेत. शनिवारी मध्यरात्री साधारण १ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास हरिहरेश्वर येथे असणाऱ्या ममता होमस्टे या ठिकाणी दहा पर्यटकांनी भरलेली एक स्कॉर्पिओ गाडी आली होती. गाडीतून आलेले पर्यटक हे मद्यधुंद होते. ही बाब हॉटेलचे मालक यांच्या निदर्शनास येताच त्यांनी पर्यटकांनी राहण्यासाठी नकार दिला. त्यामुळे पर्ययटकांनी वाद केला.

ममता होम स्टेचे मालक अभि धामणस्कर यांनी पर्यटकांना तुम्ही दुसऱ्या हॉटेलमध्ये जा असे सांगितल्यानंतर पर्यटकांमधील काही जणांचा तोल सुटला व त्यांनी अभि धामणस्कर याला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्या ठिकाणी आरडा-ओरडा झाल्यानंतर गावातील शेजारच्या व्यक्तीदेखील धावत आल्या. त्यामध्ये अभि धामणस्कर यांची बहीण ज्योती धामणस्कर यादेखील त्या ठिकाणी आल्या होत्या. घटना घडलेल्या ठिकाणी ग्रामस्थांची संख्या वाढते असे पाहिल्यानंतर पर्यटकांनी पळ काढण्यासाठी गाडी जोरात पुढे घेतली. यावेळी पर्यटकांनी अभि धामणस्कर यांना तुम्हाला गाडीखाली मारून टाकू अशा प्रकारे धमकीदेखील दिली. त्यानंतर ज्योती धामणस्कर यांच्या अंगावरती जबरदस्तीने स्कॉर्पिओ गाडी चढवून त्यांना मारण्याचा प्रकार पर्यटकांच्या हातून घडला.

यावेळी पर्यटकांमधील एक तरुण हरिहरेश्वर याच ठिकाणी राहिल्याने त्याला ग्रामस्थांनी पकडून ठेवले होते. त्यानंतर श्रीवर्धन पोलीस घटनास्थळी गेल्यानंतर पर्यटकाला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पकडलेल्या एका आरोपीकडून पोलिसांनी सर्वांचे नंबर घेतल्यानंतर त्यातील दोन नंबर श्रीवर्धन परिसरातच लोकेट झाल्याचे पाहायला मिळाले. पान २ वर

### पर्यटन व्यवसायिकांनी मांडल्या समस्या

**श्रीवर्धन तालुक्यात अनेक पर्यटक आपल्या वाहनांमधून येत असतात. आलेल्या बहुतांश वाहनांच्या काचांमागे पोलीस नावाचा फलक तसेच वाहनात पोलीस टोपी ठेवलेली असते. अनेकदा हे पर्यटक पर्यटन व्यवसायिक व स्थानिकांशी दादागिरी करतात. अशा वाहनांची चौकशी करावी त्याचप्रमाणे हरिहरेश्वर येथील अनेक वर्षे बंद अवस्थेतील पोलीस चौकी सुरू करीत तेथे कायमस्वरूपी किमान दोन पोलीस कर्मचारी तैनात असावेत जेणेकरून टवाळ पर्यटक शांतता भंग करणार नाही. पर्यटन व्यवसायिकांनी मांडलेल्या समस्यांवर उपविभागीय पोलिस अधिकारी सवीता गर्जे यांनी समस्यांची अवश्य दखल घेतली जाईल, असे आश्वासन दिले.**

## प्रीतम म्हात्रेंचा भाजपला थेट इशारा!

■ **येत्या काळात शेकामध्ये इनकमिंगची लाट आणणार**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उरण विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाचे प्रीतम म्हात्रे यांचे भाजपसमोर मोठे आव्हान असणार आहे, असे चित्र म्हात्रे यांना मतदारसंघात मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादावरून दिसत आहे. रविवारी पळस्पे गावामध्ये प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली असता मोठा जनसमुदाय त्यांच्या स्वागतासाठी हजर होता.

उरण विधानसभा मतदारसंघातून प्रीतम म्हात्रे हेच पुढचे आमदार असावेत, अशी सर्वसामान्य कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचा प्रत्यय प्रीतम म्हात्रे यांच्यासाठी जमा होणाऱ्या गर्दीवरून दिसत आहे. उरण विधानसभा मतदारसंघातून काही झाले तरी आपण निवडणूक लढवणार असून येत्या काळात भारतीय जनता पक्षामधून शेतकरी कामगार पक्षामध्ये मोठ्या प्रमाणात इनममिंग होणार असल्याचे संकेत प्रीतम म्हात्रे यांनी पळस्पेमध्ये बोलताना दिले.



### बीजेपी खाली करू!

**निवडणुकीसाठी फॉर्म भरणारच आहोत. ज्या दिवशी आपण फॉर्म भरू, त्या दिवसापासून पुढच्या तीन दिवसांत ३० टक्के बीजेपी खाली करू हे उद्गार काढताच टाळ्या आणि शिट्यांनी प्रीतम म्हात्रे यांना उपस्थितांनी प्रतिसाद दिला.**

## वेधक

### ज्योती मेटे यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**पुणे :** विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यापासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे. अशातच अनेक नेते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. रविवारी (दि.२०) शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या ज्योती मेटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. शरद पवार गटाकडून बीडमधून ज्योती मेटे यांना उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. आज शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत ज्योती मेटे यांचा पक्ष प्रवेश पार पडला आहे.

### फुटबॉल सामन्यानंतर मैदानात अंधाधुंद गोळीबार

**अमेरिका :** अमेरिकेतील मिसिसिपी राज्यात खळबळजनक घटना घडली आहे. मध्य मिसिसिपीमध्ये दोन बंदूकधारी इसमांनी जमावावर गोळीबार केला आहे. या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत. फुटबॉलच्या सामन्यानंतर ही गोळीबाराची घटना घडली आहे. सामना संपल्यानंतर बरेच जण मैदानावर जल्लोष करत होते. त्याचवेळी त्यांच्यावर हा हल्ला झाला. मिसिसिपीमधील लेक्सगटपासून तीन किमी दूर होम्स काउंटी कन्सोलिडेटेड स्कूलमध्ये ही गोळीबाराची घटना घडली आहे. होम्स काउंटीचे शेरिफ विली मार्च या घटनेची माहिती देताना म्हणाले, कार्यक्रमादरम्यान काही लोकांमध्ये मोठं भांडण झालं होतं.

### चार कोटींचे सोने जप्त

**सोलापुर :** विधानसभा निवडणूक जाहीर झाली असून राजकीय पक्षांची तयारी सुरु झाली आहे. आता प्रचार सभांचा धडाका सुरु होणार आहे. त्याचवेळी निवडणूक आयोग सक्रीय झाला आहे. निवडणुकीत गैरप्रकार टाळण्यासाठी आयोगाने धडक नियोजन केले आहे. उमेदवारांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष असणार आहे. तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यातील सीमेवर तपासणी पथक तयार केले आहे. त्याचवेळी आंतरराज्य सीमेवर पोलीस बंदोबस्त वाढवला आहे. दुसऱ्या राज्यातून अवैध वाहतुकीवर निर्बंध आणले आहेत. तसेच सीमा नाक्यावर सीसीटीव्हीही बसवण्यात आले आहे. आता रविवारी विदर्भात मोठी कारवाई झाली आहे. मध्यप्रदेश महाराष्ट्राच्या सीमेवर ३ कोटी ९१ लाख रुपयेचे सोने जप्त करण्यात आले आहे.

## विकासाच्या थापा मारणाऱ्या आमदारांना जनता कंटाळली- स्नेहल जगताप

**सडवलीतील आदिवासी बांधवांचा शिवसेना पक्षप्रवेश**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

विकासाच्या थापा मारणाऱ्या आमदारांना जनता कंटाळली आहे. सर्वसामान्य जनतेला गरीबच ठेऊन स्वतःच्या बगलबच्च्यांनाच आमदार शेठ बनवित असल्याची कडवट टीका महाड विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांनी केली.

महाडच्या कॅप्टन जगताप बंगला येथे सडवलीतील शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी विधानसभा उमेदवार स्नेहल माणिक जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला. यावेळी स्नेहल जगताप-कामत बोलत होत्या. तसेच ही तर सुरुवात आहे आगे-आगे देखो होता हैं क्या? असं सूचक वक्तव्यही स्नेहल जगताप यांनी केले.

यावेळी दिलीप भागवत, मंगेश मोरे, दिनेश मोरे, सचिन दुदुस्कर, सचिन पवार, अनिल पवार, अभिषेक गरुड, पान २ वर



## सत्ताधाऱ्यांविरोधात जरांगेंनी फुंकले रणशिंग

**जालना :** विधानसभा निवडणुकीत ज्या ठिकाणी उमेदवार निवडून येऊ शकतात, तिथं मराठा समाजाचे उमेदवार उभे करायचे आणि ज्या ठिकाणी निवडून येऊ शकत नाही तेथील आपल्या विचारांच्या उमेदवारांकडून स्टॅम्प पेपरवर लिहून त्यांना निवडून आणायचं आहे. ज्यांना उमेदवारी अर्ज भरायचे आहे त्यांनी भरावे, पण २९ ऑक्टोबरला मी सांगितलेल्या ठिकाणी अर्ज कायम ठेवून निवडणुक लढवायची असल्याची घोषणा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी (दि.२०) अंतरवाली सराटीमध्ये सभा घेऊन केली. जरांगे पाटील यांनी उमेदवार देण्याची घोषणा केल्याने त्याचा फटका कोणाला बसणार? याचं पान २ वर

## जयंतभाई यांनी आदेश दिल्यास
# कर्जतमध्ये शेकाप लढायला तयार

■ **पक्षाच्या बैठकीत ठराव**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाची ताकद नक्कीच कोणत्याही पक्षाला उमेदवार विजयी करण्यासाठी निर्णायक आहे. मात्र महाविकास आघाडी शेतकरी कामगार पक्षाचा सन्मान ठेवणार नसेल तर पक्ष नेतृत्वाने आदेश दिल्यास कर्जतमध्ये शेतकरी कामगार पक्ष लढायला तयार आहे, असा इशारा शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते पुंडलिक शिनारे यांनी कार्यकर्ता बैठकीत दिला.

शेकापच्या कर्जत तालुका बैठकीत सभा अध्यक्ष म्हणून शिनारे बोलत होते. दरम्यान, पक्षाने आम्ही काय करावे असा आदेश द्यावा आणि आपली ताकद अन्य पक्षांना दाखवण्याची संधी द्यावी, असा ठराव कर्जत तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या बैठकीत करण्यात आला.



कर्जत तालुका शेतकरी कामगार पक्षाची सर्वसाधारण सभा नेरळ येथील शेतकरी भवनमध्ये आयोजित करण्यात आली होती. ज्येष्ठ कार्यकर्ते पुंडलिक शिनारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे माजी सभापती नारायण डामसे, तालुकाकृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश फराट, पुंडलिक शिनारे, बाजार समितीचे माजी सभापती गजानन पेमारे, अशोक भुसाल, विठ्ठल भुंडेरे, महिला तालुका अध्यक्ष जयवंती हिंदोळा, युवक अध्यक्ष महेश म्हसे, नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी अध्यक्ष राजेंद्र विरले, बाजार समिती संचालक संतोष वैखरे, उप सभापती रवींद्र झांजे, जिल्हा बँकेचे माजी संचालक राजेंद्र हजारे, अलिबाग अर्बन बँकेचे संचालक अनिल जोशी, विष्णू कालेकर, कृष्णा बदे, रमाकांत जाधव, कृष्णा भगत आदी मान्यवर उपस्थित होते. कर्जत तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांना मागणीनंतर तालुका कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली.

जिल्हा बँकेचे माजी संचालक आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश फराट यांनी यावेळी बोलताना आपल्या पान २ वर

# दिल्लीत सीआरपीएफ शाळेच्या भिंतीजवळ स्फोट

**पांढऱ्या पावडरमुळे फॉरेन्सिक टीम चकीत; दहशतवादी कटाचा संशय?**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीमधील रोहिणी परिसरातील प्रशांत विहार भागात सकाळी पावणे आठच्या समारास मोठा स्फोट झाला. या स्फोटाच्या आवाजाने स्थानिकांमध्ये भितीचं वातावरण पसरलं आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या शाळेच्या भिंतीजवळ हा स्फोट झाला आहे.

स्फोटानंतर आकाशात दूरवर मोठ-मोठे धुराचे लोट पसरले होते. हे चित्र पाहून रोहिणी परिसरातील लोकांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं आहे. या स्फोटात कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. मात्र हा स्फोट इतका मोठा होता की आसपासच्या घरांच्या भिंतींना भेगा पडल्या आहेत. अनेक घरांच्या खिडकीच्या काचा फुटल्या आहेत.

रोहिणीचे पोलीस पोलीस उपायुक्त अमित गोयल या घटनेची माहिती देताना म्हणाले, आम्ही या स्फोटाचं कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहोत. यासाठी तज्ज्ञांच्या पथकाला पाचारण केलं आहे. स्फोटाची माहिती मिळाल्यानंतर आम्ही या परिसरात पोलिसांची मोठी तुकडी तैनात केली आहे.

तज्ज्ञांचं पथक तपासाअंती या प्रकरणाची माहिती देईल. दरम्यान, स्थानिकांनी सकाळी ७.५० च्या सुमारास अग्निशमन दलाला या स्फोटाची माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळाची पाहणी केली. तिथे कुठेही आग लागल्याचं किंवा इमारतीचं नुकसान झालेलं नसल्याचं निदर्शनास आलं.

अग्निशमन दलाच्या पथकाने व एनसजी, दिल्ली पोलीस, एफएसएलच्या पथकाने संपूर्ण परिसर पिंजून काढला. या शोधमोहिमेत त्यांना काही संशयास्पद वस्तू आढळल्या आहेत. या घटनेचा तपास पान २ वर

## नेरळ-जीते येथे गुटखा कारखान्यावर धाड

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ परिसरात मोठ्या प्रमाणात गुटख्याची विक्री सुरू आहे. अनेक दुकान, टपरीवर हमखास गुटखा मिळतो. परंतु, हा गुटखा नेमका येतो कुठून याचा शोध अद्याप लागत नाही. नेरळ परिसरातील नेरळ-जिते येथे एका दुकान गाळ्यात गुटखा कारखाना सुरू असल्याची माहिती नेरळ पोलिसांना मिळाली होती. या गुटखा कारखान्यावर नेरळ पोलिसांनी धाड टाकली असून तेथे त्यांना गुटखा मिळून आला आहे. गुटखा पॅकींग मशिन आणि एस.के. नावाचे गुटखा पॅकेट सापडले आहेत. याबाबत नेरळ पोलिसांनी ३ जणांना अटक केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार नेरळ परिसरातील जिते परिसरात एका पान २ वर

# हवालाच्या तीन कोटी रुपयांवर दरोडा टाकण्यासाठी ‘हनी ट्रॅप’

**। कराड । प्रतिनिधी ।**

मुंबईहून कर्नाटकाला हवालाची तीन कोटींची रक्कम पोहोचवण्यासाठी निघालेल्या मोटारगाडी चालकाला हनी ट्रॅपच्या जाळ्यात ओढून हा सशस्त्र दरोडा टाकण्यात आला, समाज माध्यामातून संपर्कात आलेल्या महिलेने चालकाचे लोकेशन शोधले आणि हनी ट्रॅपमुळे चालक गुन्ह्यात अडकल्याचे पोलीस तपासातून समोर आले आहे. संबंधित महिलेसह १० जण गजाआड झाले आहेत.

पुणे- बंगळुरू महामार्गावर कराडजवळ चार दिवसांपूर्वी मंगळवारी उत्तररात्री झालेल्या या सशस्त्र दरोड्यातील तीन कोटींपैकी २ कोटी ८९ लाख ३४ हजारांची रक्कम स्थानिक गुन्हे शाखा व कराड शहर पोलिसांनी हस्तगत केली आहे. या टोळीने दरोड्यासाठी दोन महिने रेकी केली. फिर्यादी चालक शैलेश घाडगे व बदली चालक अविनाश घाडगे या दोघांवरही गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांनी सांगितले.

अजमेर मोहमंद मांगलेकर (३६, रा. गोळेश्वर- कराड), नजर मोहमंद आरीफ मुल्ला (३३, रा. रविवार पेठ, कराड) करीम अजीज शेख (३५, रा. मंगळवार पेठ, कराड), नजीर बालेखान मुल्ला (३३, रा. सैदापूर) यांच्यासह रक्कम घेऊन निघालेल्या मोटारगाडीचे चालक शैलेश शिवाजी घाडगे (२४) व अविनाश संजय घाडगे (२१, दोघेही रा. निमसोड, ता. खटाव), ऋतुराज धनाजी खडंग, त्याचा भाऊ ऋषिकेश तसेच अक्षय अशोक शिंदे आणि कराडच्या मंगळवार पेठेतील संशयित महिला अशांना अटक झाली आहे.

कराडच्या कुख्यात गुंडाचाही गुन्ह्यात सहभाग समोर आला असून, तो व आणखी एक इसम फरार आहे. तेही लवकरच हाती येतील, असा पोलिसांना विश्वास आहे. संशयित महिलेची समाज माध्यमावर चालक घाडगे याच्याशी ओळख होऊन त्यांच्यात संवादही होता. दोन महिन्यांपूर्वी दूरचित्रसंपर्क झाला. त्यावेळी त्याने हवालाचे पैसे पोहोचवण्यासाठी निघाल्याचे तिला दाखवले. ही माहिती त्या महिलेने तिच्या ओळखीच्या पान २ वर

### विधानसभा निवडणूक २०२४


# उमेदवाराला खर्च मर्यादा 40 लाखांची

■ **खर्चात बारा लाखांनी केली वाढली**

■ **चहापासून ते जेवणापर्यंत दर निश्चित**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

निवडणूक म्हटली की खर्च आलाच. त्यामुळे निवडणूक आयोग खर्चाची मर्यादा निश्चित करते. यंदा निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीत खर्चाच्या मर्यादेत वाढ केली असून उमेदवारांना ४० लाख रुपये एवढा खर्च करता येणार आहे. याआधी ही मर्यादा २८ लाख एवढी होती. त्यात १२ लाखाने वाढ करण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाने दिली आहे; मात्र खर्चाचा हिशेब उमेदवारांना द्यावा लागणार आहे. निवडणूक आयोगाने जेवणाची थाळी, चहा, पाणी यांचे दर निश्चित केले आहे. ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त खर्च केल्यास आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल उमेदवारांवर कारवाई होऊ शकते. दरम्यान, व्हेज थाळी १८०, नॉनव्हेज थाळी २४० रूपये, पोहे २०, चहा १०, तर पाणी बाटलीचा दर १७ रूपये ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. पान २ वर



### खर्चावर पथकांची करडी नजर

निवडणुकीत पैशांच्या उधळपट्टीला लगाम लावण्यासाठी खर्च मर्यादा निश्चित केली जाते. त्यामुळे निवडणूक विभागाचे उमेदवाराच्या खर्चाकडे विशेष लक्ष असेल. गेल्या काही वर्षात प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील लोकसंख्या वाढली आहे. महागाईतही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे निवडणूक खर्चाची मर्यादा वाढावी, अशी मागणी अनेक पक्षांनी केली होती. त्यामुळे निवडणूक आयोगाने खर्च मर्यादा वाढवली आहे.

### स्वतंत्र बँक खाते उघडणे बंधनकारक

विधानसभा निवडणूक २०२४च्या अनुषंगाने उमेदवारांनी निवडणुकांच्या खर्चाकरिता उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी किमान एक दिवस अगोदर स्वतंत्र बँक खाते उघडणे बंधनकारक आहे. त्वरित धनादेश पुस्तिका निर्गमित करणे, निवडणूक काळात स्वतंत्र काउंटर सुरू करणे उमेदवारांना रकमा जमा करणे व काढण्याकरिता प्राधान्य देण्यात आले असून तशा सूचनादेखील प्रशासनाने केल्या आहेत.

### खर्चांचा तपशील

खर्चांचा प्रकार व दर : व्हेज थाळी स्पेशल १८०, नॉनव्हेज थाळी २४०, बिर्याणी १५०, पोहे २०, चहा १०, कॉफी १५, वडापाव १५, भजे प्लेट २०, पाणी बाटली १७, मिसळपाव ६०, पाव भाजी ६०, फुलांचा मोठा हार ८०, गांधी टोपी १०, फेटा १९०, ढोल-ताशा (प्रतिव्यक्ती) ५००



## भाजपकडून माणसे तोडण्याचे काम : खा. अखिलेश यादव

**। धुळे । प्रतिनिधी ।**

धुळ्यातील जनतेने माझ्यावर फुलांचा वर्षाव बुलडोझरने करीत माणसे जोडण्याचे काम केले आहे, तर उत्तर प्रदेशात भाजपचे सरकार बुलडोझरच्या साहाय्याने माणसे तोडण्याचे काम करीत आहे. हाच फरक जातीयवादी व समाजवादी विचारसरणीत आहे. समाजवादी पक्ष माणसे जोडण्याचे काम करतो, तर भाजप माणसे तोडण्याचे काम करतो, अशी टीका समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांनी येथे केली.

शहरातील जेल रोडवर समाजवादी पक्षाचे उमेदवार इर्शाद जहागीरदार यांच्या प्रचारार्थ शनिवारी (ता.१९) पान २ वर

# लोकशाहीच्या महोत्सवासाठी प्रशासन अलर्ट मोडवर



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून अलर्ट मोडवर असून कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीपासून मतदार यादीला अंतिम स्वरूप देण्याच्या कामे सुरू झाली आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातून सर्व कामांवर लक्ष ठेवले जात आहे. विधानसभा निवडणुकीसाठी तालुक्यातील सहा लाख ४६ हजार १४७ मतदारांसाठी ६०४ बुथवर सुमारे चार हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून त्यासाठी प्रशासनाकडून नियोजन सुरू आहे.

शनिवारपर्यंत मतदार नोंदणीची प्रक्रिया सुरू असल्याने मतदान केंद्रात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. मतदारांच्या सोयीसाठी मतदान केंद्राच्या शेजारी सहाय्यक मतदान केंद्राची निर्मिती केली जाणार आहे. नियुक्त कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण पुढील आठवड्यात होणार आहे.

राज्य, केंद्र सरकारचे अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. त्याशिवाय खासगी, सरकारी शाळा, बँका, सरकारचे अन्य विभागांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामात सहभागी करून घेतले जाणार आहेत. सुमारे ३४ दिवस हा लोकशाहीचा उत्सव चालणार आहे. निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान होईल, या दृष्टीने जनजागृती करण्यासाठी शासकीय यंत्रणेला सहकार्य करावे तसेच आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक केले आहे..

विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेदरम्यान कोणतेही निवडणूक संबंधी साहित्य रहदारीस अडथळा होईल व अपघात होईल, असे लावण्यास निर्बंध जारी केले आहेत. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी अथवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणुकीसंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, प्रसिद्धीपत्रके, कटआऊट्स, होर्डिंग्ज, कमानी आदी रहदारीस अडथळा निर्माण होऊ शकेल व अपघात होईल अशा पद्धतीने लावण्यावर निर्बंध घातले आहेत.

खासगी व्यक्तींच्या जागेवर व सार्वजनिक प्राधिकरणाच्या जागेवर संबंधितांच्या परवानगी शिवाय निवडणूक प्रचाराचे साहित्य लावण्यास निर्बंध आहेत.

निवडणुकीच्या प्रचारासाठी झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी फलक लावणे, भित्तीपत्रक लावणे, घोषणा लिहिणे इत्यादीकरिता कोणत्याही व्यक्तीच्या खासगी जागा, इमारत, आवार, भिंती इत्यादीवर संबंधित मालकीच्या परवानगी शिवाय व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाची परवानगीशिवाय वापर करण्यास निर्बंध लावण्यात आले आहेत.

राजकीय पक्षांनी, उमेदवारांनी, त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी मुद्रणालयाचे मालक व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकांनी तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे तसेच आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापण्याबाबत निर्बंध घालण्यात आल्याचे आदेश जारी केले आहेत. प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार, निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांच्या हितचिंतकांना निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक, झेंडे लावण्यास निर्बंधात्मक आदेश जारी केले आहेत. फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला राहणार नाही; तसेच तो त्या वाहनाच्या टपापासून २ फूट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही.

## पक्ष कार्यालय स्थापन करण्यावरही निर्बंध

**सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरत्या स्वरूपात पक्ष कार्यालय स्थापन करण्यास निर्बंधनिवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरत्या स्वरूपात पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध घालण्याचे आदेश जारी केले आहेत.**



# श्रीगुरूमाता सेवाश्रम नांदगाव येथे महालक्ष्मी याग संपन्न

**। मुरूड । वार्ताहर ।**

श्रीगुरू सावर्डेकर महाराज संस्थापित रूद्ररेवा सेवा प्रतिष्ठान अंतर्गत श्रीगुरूमाता सेवाश्रम नांदगाव येथे आयोजित श्री महालक्ष्मी याग भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

श्रीक्षेत्र उज्जैन येथून या यज्ञासाठी विषेश हवन सामुग्री आणण्यात आली होती. कोजागिरी पोर्णिमा रोजी सकाळच्या सत्रात आगमोक्त चंडी याग करण्यात आला. सायंकाळी ५ वाजता आगमोक्त श्रीविद्या उपासनेच्या परंपरेने श्रीयंत्र आवरणपूजा , ऊन्मिलनसह कुंकूमार्जन हे विधी झाले. कन्यापूजन या कार्यक्रमात उपस्थित लहान मुलींचे पूजन करून त्यांना शालेय उपयोगी साहित्य भेट देण्यात आले.रात्री लक्ष्मी इंद्र व दूध पूजन झाले. यज्ञासाठी आलेल्या सज्जनांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मुरूड तालुक्याच्या विविध भागातून तसेच महाराष्ट्रातील अनेक भागातून सज्जन भाविक उपस्थित होते.

# सर्पमित्र महेश साळुंखे यांनी दिले ५ फुटी नागाला जीवदान

**। कोर्लई । वार्ताहर ।**



मुरुड तालुक्यातील एकदरा गावात जाळ्यात अडकलेल्या ५ फुटी नागाला सर्पमित्र महेश साळुंखे यांनी सुखरूप सोडवून जीवदान दिल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी वनविभागाचे वनरक्षक मिलिंद धुरी, व त्यांचे सहकारी दिनेश रोटकर उपस्थित होते. या नागाला वनखात्याच्या सहकार्याने जवळील जंगलात सोडून दिले.

एकदरा गावातील मंगेश पाटील यांच्या घराच्या मागील कंपाऊंड ला असलेल्या जाळ्यात हा नाग रात्र भर अडकून पडला होता. सकाळी हे निदर्शनास आल्यानंतर सर्पमित्र महेश साळुंखे यांना बोलाविण्यात आले होते व वन विभागाला ही कळविण्यात आले. या नागाला एक तासाच्या प्रयत्नानंतर सुखरूप वाचविण्यात यश आले.

## रिक्षा महासंघाच्या अध्यक्षावर कारवाई

**पनवेल :** आरटीओ अधिकाऱ्यांना धंद्याला लावतो अशी धमकी देत २ लाखाची व महिना २० हजाराची मागणी करणाऱ्या नवी मुंबईच्या रिक्षा महासंघाच्या अध्यक्षा विरोधात नेरुळ पोलिसांनी कारवाई केली आहे. या संदर्भात सबळ पुराव्यासह आरटीओ अधिकाऱ्यांनी नेरुळ पोलिसांकडे तक्रार केली होती. तपासादरम्यान २० हजाराची खंडणी घेताना कासम मुलानी याला रंगेहाथ पकडण्यात आले होते. त्याच्यावर नेरुळ पोलिसांनी कारवाई करत तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# दस्तकारी हाटचे २३ ऑक्टोबरपासून वाशी येथे आयोजन

**। वाशी । वार्ताहर ।**

देशभरातील २० राज्यातील कुशल कारागिरांनी बनविलेल्या हस्तनिर्मित कपडे, साड्या, शाली, आणि गालिचे यांचा समावेश असणारे दस्तकारी हाट हे वस्त्र प्रावरणांचे प्रदर्शन २३ ते २८ ऑक्टोबर २०२४ दरम्यान सिडको एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित केले जाणार आहे.

हे प्रदर्शन दररोज सकाळी ११ वाजता ते रात्री ९ वाजेपर्यंत खुले असेल. या विशेष प्रदर्शनात बनारसी सिल्क, लिनन, कॉटन आणि उत्सवी पारंपारिक परिधानांचा समावेश असं असणार आहे. साड्या, ड्रेस, सूट, कुर्ते, शाली आणि हस्तनिर्मित कपडे या कार्यक्रमात प्रदर्शित केले जातील.

विशेष आकर्षणांमध्ये बनारसी सिल्क साड्या, कुर्ते, बेडशीट्स आणि गालिचे यांचा समावेश आहे. विविध हस्तकला उत्पादने देखील एकाच छताखाली उपलब्ध असतील. भारताच्या विविध राज्यांतून आणलेल्या रेशीम आणि कॉटनचे १०० पेक्षा अधिक स्टॉल्स या प्रदर्शनात असतील.

# लायन्स क्लब कोलाडच्या वतीने विद्यार्थ्यांना सायकल वाटप



**। कोलाड । वार्ताहर ।**

कोलाड लायन्स क्लबच्या वतीने रोहा तालुक्यातील पुई येथील विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले आहे. लायन्स क्लब इंटरॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४ च्या अधिपत्याखाली गेली चार वर्षे कोलाड विभागात कोलाड लायन्स क्लब विविध उपक्रम राबवत आहे या अनुषंगाने विभागातील पुई येथीलमंजीरी संतोष दिवेकर इयत्ता सहावीत कोलाड हायस्कूल येथे शिक्षण घेत असलेल्या या गरजवंत विद्यार्थिनीला सायकलचे वाटप करण्यात आले.

कोलाड लायन्स क्लबचे संस्थापक अध्यक्ष तथा मार्गदर्शक डॉ.सागर सानप यांच्या मार्गदर्शनाखाली व लायन्स क्लब सह खजिनदार अलंकार खांडेकर यांच्या विशेष सहकार्यातून लायन्स क्लब कोलाडच्या वतीने सायकल वाटप करण्यात आल्या.

यावेळी क्लबचे अध्यक्ष डॉ.मंगेश सानप, रविंद्र लोखंडे, डॉ.श्याम लोखंडे, डॉ. माधव आग्री, नंदकुमार कळमकर, अनिल महाडिक, दिनकर सानप, अनंत सानप, विठ्ठल पवार, समीर पडवळ, हरिश्चंद्र कदम, अजित लहाने, सचिन दिसले, गोपाळ खामकर, सुनील लहाने, आत्माराम खामकर, राजेंद्र कदम, पांडुरंग खामकर, मंगेश सानप, विश्वास लहाने, संदेश मोहिते, संदिप शिर्के, वामन कदम, विठोबा सानप, सचिन लहाने, लक्ष्मण पवार, अनिकेत शिर्के, श्रीकांत लहाने, अलोक दिवेकर, प्रकाश पाटील, हेमंत महाडीकसह पुई ग्रामस्थ उपस्थित होते.

# आचारसंहितेमुळे फलक बाजीला लगाम

**। तळा । वार्ताहर ।**

राज्यातील विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर होताच आचारसंहिता लागू झाल्याने दुपारनंतर प्रशासनाकडून शहर परिसरात ठिकठिकाणी लावण्यात आलेले राजकीय फलक काढण्यास सुरूवात झाली. नाईलाजाने का होईना नगरपंचायतीला फलक काढावे लागत असल्याने फलकांमुळे घुसमटलेले शहरातील रस्ते, चौक काही दिवस का असेना मोकळे दिसतील.

महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी निवडणूक होणार आहेत. निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी आधीपासूनच तयारी सुरू केली आहे.गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि अवघ्या दोन आठवड्यावर आलेल्या दिपोत्सवाच्या शुभेच्छा देण्यासाठी इच्छुकांकडून सर्वत्र फलकबाजी करण्यात आली होती. शहराच्या मुख्य रस्त्यांवरील दुभाजकांजवळील विद्युत खांब, कमानी, चौक, वाहतूक बेटे, यासह मिळेल त्या ठिकाणी शुभेच्छा देण्यासाठी

फलकबाजी करण्याची जणू स्पर्धाच लागली होती. यामध्ये विद्यमान लोकप्रतिनिधींसह इच्छुकांनी लहान-मोठ्या आकारात फलक लावत नागरिकांवर शुभेच्छांचा वर्षाव केला.याशिवाय, राजकीय पक्षांकडून वेगवेगळ्या शासकीय योजनांची माहिती देणारे फलक, नेत्यांच्या दौऱ्याच्या वेळी त्यांचे स्वागत करणारे फलक लावल्याने शहरातील रस्त्यांचा श्वास कोंडला होता. कुठलेही नियोजन न करता सुरू असलेल्या फलकबाजीमुळे काही ठिकाणी फलक पडून किरकोळ अपघातही झाले. मात्र इच्छुकांना त्याविषयी काहीही देणेघेणे नव्हते.मंगळवारी आचारसंहिता जाहीर होताच प्रशासनाच्या वतीने शहर परिसरात ठिकठिकाणी लावण्यात आलेले फलक काढण्यास सुरूवात झाली.नगरपंचायतीच्या संबंधित विभागाने फलक काढण्याचे काम उशिरापर्यंत सुरू ठेवले.

पान १ वरून

## गाडीने महिलेला चिरडले

श्रीवर्धन पोलिसांनी अन्य दोन आरोपींना श्रीवर्धन बस स्थानक परिसरातून अटक केली आहे. तर अन्य फरार झालेल्या पर्यटकांचे लोकेशन पुणे येथे दाखवत असल्यामुळे श्रीवर्धन पोलिसांचे पथक आरोपींना ताब्यात घेण्यासाठी रवाना करण्यात आले आहे. या प्रकरणी श्रीवर्धन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पर्यटक ईरप्पा यमनप्पा धोत्रे, आकाश गावडे, आकाश उपरवट, नीरज उपरवट, आशिष सोनवणे, अनिल माने, विकी सिंग, आमील नागुर, सचिन जमादार, आदिल शेख, सचिनचा मित्र टिल्लू (पूर्ण नाव माहित नाही) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळी श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गरजे, माणगावचे उपविभागीय पोलिस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक यु.बी. रिकामे या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक एन. एस. लकडे हे अधिक तपास करत आहेत.

सदर प्रकरणामुळे श्रीवर्धन तालुक्यात पर्यटन व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडालेली पाहायला मिळत आहे. दरम्यान, पोलिसांनी तत्काळ श्रीवर्धन तालुक्याबाहेर जाण्याच्या सर्व मार्गांवर नाकाबंदी केली असून पर्यटकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

## जयंतभाई यांनी आदेश दिल्यास कर्जतमध्ये शेकाप लढायला तयार

सांगोला विधानसभेमध्ये आपल्या पक्षाला उमेदवारी मिळणार नसेल तर पक्षाने येणाऱ्या सर्व निवडणुका स्वबळावर लढविण्याची गरज आहे. पक्ष टिकवून ठेवायचा असेल तर आपण स्वबळावर निवडणुकीला सामोरे जावे लागेल, अशी भूमिका पक्षाने जिल्हा नेतृत्वाला कळवायला हवी. तालुका उपाध्यक्ष रवींद्र भोईर यांनी २४ तासात पक्षाचे २००हून अधिक सक्रिय कार्यकर्ते या ठिकाणी एकत्र आणले आहेत, त्यामुळे पक्ष संपला आहे हे बोलणारे यांना मोठी चपराक असून निवडणुकीत आपण ते दाखवणार आहोत. विभाग चिटणीस पांडुरंग बदे यांनी आपल्या पक्षाने भूमिका जाहीर करण्याआधी पक्षाला कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकीत काय देणार हे जाहीर करायला हवे.या मतदारसंघात शेकापची ताकद निर्णायक असून शेकापला बरोबर घेतल्याशिवाय कोणाचाही आमदार होणार नाही, असा ठाम विश्वास व्यक्त केला. आपण ज्यांना मदत करणारा ते निवडून आल्यावर काय देणार हे आधी वदवून घ्यायला हवे कारण नंतर ते आपल्याला जवळपास येऊ देत नाही, अशी खंत पांडुरंग बदे यांनी व्यक्त केली.

अल्पसंख्याक सेल जिल्हा उपाध्यक्ष बबन भालेराव यांनी आपण मतदारांपर्यंत जाऊन कार्यकर्त्यांना भेटून आपली भूमिका पटवून द्यायची आहे. कार्यकर्ते संभ्रमात असून पक्षाने आपली भूमिका पक्ष आयात उमेदवार देण्याचा विचार करणार असेल तर लवकर निर्णय घ्यावा, पक्षाचा निर्णय आम्हा कार्यकर्त्यांना मान्य असेल असे जाहीर केले. विष्णू कालेकर यांनी पक्षाने भूमिका जाहीर करावी कारण कर्जत विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षाची भूमिका किंग मेकरची असल्याने पक्षाने आम्हाला कार्यकर्त्यांना पक्षाची भूमिका जाहीर करावी, असे आवाहन कालेकर यांनी केले. आदिवासी कार्यकर्ते दत्तात्रय निरगुडा यांनी आपल्या पक्षाचा वापर केला जात असून आपल्याला गाजर देण्याचे काम आपले मित्र पक्ष आणि विरोधी पक्षदेखील करीत आहेत.त्यामुळे आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सांभाळून राहावे, अशी विनंती केली.

आम्ही लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार विजय होणार असे जाहीर केले होते आणि शेकापच्या कार्यकर्त्यांनी आघाडीवर राहून आघाडीच्या उमेदवाराला आघाडी मिळवून दिली आहे. हे महाविकास आघाडीने लक्षात ठेवायला हवे, मात्र तुम्ही फक्त आमचा वापर करणार असाल तर आम्हीदेखील आता ते सहन करणार नाही आणि पक्षाने कर्जतमध्ये शेकापची काय ताकद आहे, हे या बैठकीतील तोलामोलाचे कार्यकर्ते पाहिल्यावर कळून येईल. त्यामुळे शेकाप नेतृत्वाचा सन्मान महाविकास आघाडी ठेवणार नसेल तर मात्र कर्जतमध्ये पक्षाने आदेश दिल्यास शेकाप लढायला तयार आहे आणि आमची तशी इच्छा आहे, असा निर्धार या बैठकीत व्यक्त केला.

## सत्ताधाऱ्यांविरोधात जरांगेंनी फुंकले रणशिंग

उत्तर २३ नोव्हेंबर रोजी मिळणार आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले की, जिथं निवडून येतील तिथे उमेदवार उभे करणार आहे. एससी आणि एसटीच्या जागेवर आपण उमेदवार देणार नाही, आपल्या विचारधारेशी असणाऱ्यांना आपण निवडून आणायचं आहे. ज्या ठिकाणी आपण उभा करायचं नाही, तिथे आपण जो ५०० रुपयांच्या बाँडवर लिहून देईल त्याला आपण निवडून आणायचे, बाकीचे सर्व पाडायचे असल्याची घोषणा जरांगे पाटील यांनी केली. ते म्हणाले की, आता आपण सर्व जाती धर्माचे लोक उभे करायचे आहेत. कुठे मराठा, दलित मुस्लिम समीकरण जुळते का? याचाही अंदाज घ्यायचा आहे. एका जातीवर सीट निवडून येऊ शकत नाही. समीकरण जुळून येतोय का बघू, तुम्ही फॉर्म भरा, २९ तारखेला ज्याला फॉर्म काढायचा आहे त्यानं काढायचा. असेही त्यांनी सांगितले.

मनोज जरांगे पुढे म्हणाले की, संमिश्र ताकत ठेवली तर मराठा जिंकू शकतो. त्यामुळे काही निवडून आणू काही पाडू. ३६ मतदारसंघ असे आहेत तिथे मराठाच निवडून आणू शकतो. त्यामुळे समीकरण नाही जुळल, तर पुढं जाण्यासाठी पाहून घेऊ. ज्याने मराठ्यान संपवले आहे त्याला संपवायचं आहे. तुम्ही फॉर्म भरून घ्या, त्यात मेरिट ठरवू, २ ते ३ दिवसात मी मतदारसंघाची नाव सांगणार असल्याची घोषणा त्यांनी केली. जिथे मराठ्यांचे निवडून येथील त्याच ठिकाणी उभे करायचे, पण त्याला काही जातीचे समीकरण जुळून यायला पाहिजे. काही ठिकाणी जो आपली भूमिका मांडेल जो आपल्याला लिहून, देणार त्याला विजयी करणार असेही त्यांनी सांगितले.

## नेरळ-जीते येथे गुटखा कारखान्यावर धाड

दुकान गाळयात गुटखा तयार करण्यात येत असल्याची गुप्त माहिती नेरळ पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नेरळ पोलिसांनी त्याठिकाणी धाड टाकली. तेथे त्यांना एस.के. गुटखा, गुटखा मशिन, गुटख्याच्या गोणी असा एकूण सुमारे ३ लाख ७२ हजारांचा माल मिळून आला असून सर्व माल नेरळ पोलिसांनी जप्त केला आहे.

यात नेरळ पोलिसांनी राहुल गोविंद तिवारी((रा.इंदोर-मध्यप्रदेश), अक्षय बाबुराव गोविलकर (रा.बदलापूर-सोनिवली), विश्वनाथ राम प्रकाश प्रजापती (रा. उत्तरप्रदेश) व प्रविण परशुराम मोरगे (रा. कुडसावरे-ठाणे) यांच्यावर गुन्हा दाखल केला असून यातील तीन जणांना नेरळ पोलिसांनी अटक केली आहे. पुढील तपास नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी नितीन मंडलीक करित आहेत.

## हवालाच्या तीन कोटी रुपयांवर दरोडा टाकण्यासाठी हनी ट्रॅप

मांगलेकरला आणि त्याने मुख्य सूत्रधारास दिली आणि लुटीचा कट शिजला. दोन्ही कार चालकांना लुटीतीलच १७ लाखांची रक्कम देण्यासह खोटी फिर्याद देण्यास सांगण्यात आले. मात्र, फिर्यादीच्या माहितीत विसंगती आढळल्याचे पोलिसांनी सांगितले.हवालाची ही मोठी रक्कम कोणाला पोचवायची होती कोणाला द्यायची होती. हे अद्याप तपासात पुढे आले नसल्याने पोलिसांनी या रकमेची खातर जमा करण्यासाठी सप्त वसुली संचालनालय व प्राप्तिकल विभागास कळवले असून यासह अन्य संबंधित विभाग या रोकड संदर्भात विशेष तपास करणार आहेत.

## भाजपकडून माणसे तोडण्याचे काम : खा. अखिलेश यादव

सभा झाली. खासदार यादव, खासदार इकरा हसन, प्रदेशाध्यक्ष आमदार अबू आझमी, आमदार रईस शेख, युपीचे आमदार नाहीद हसन, इर्शाद जहागीरदार, अमीन पटेल, आकील अन्सारी, आकील मन्सूरी, काँग्रेसचे साबीर शेठ, कैलास चौधरी, गुड्डू काकर, नरेंद्र चौधरी, महेंद्र शिरसाट आदी उपस्थित होते. खासदार यादव म्हणाले की, भाजप देशात धार्मिक तेढ निर्माण करीत आहे. भाईचारा तोडत आहे. स्वामी विवेकानंद अमेरिकेत गेले तेव्हा त्यांनी देशाची एकता व अखंडतेचे गुण गायिले, हे भाजप विसरत आहे. इकरा हसन यांनी समाजवादी विचारांचे सरकार सत्तेवर आले तर सर्वांना सोबत घेऊन विकास केला जाईल, असा विश्वास दिला.

महाराष्ट्राची निवडणूक ऐतिहासिक व मार्गदर्शकराज्यात लोकनियुक्त सरकार सत्तेवर असताना त्यांना गद्दारी करीत सत्तेवरून बाहेर करण्याचे पाप भाजपने केले आहे. महायुतीच्या महादुःखी सरकारला जनतेने सत्तेवरून बाहेर करण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राची निवडणूक ही देशासाठी ऐतिहासिक व मार्गदर्शक आहे. देशात बेरोजगारी, भूकमारी, शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत.उद्योगधंदे गुजरातला नेले जात आहेत. बँक लुटल्या जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात त्यांच्या पुतळ्याच्या कामात घोटाळा होत आहे. लाडकी बहीण योजना आणून महागाई वाढविली जात आहे. महाराष्ट्र ही आंबेडकरांची कर्मभूमी आहे, याठिकाणी संविधान बदलाची भाषा कोणी करत असेल तर जनता त्यांना सत्तेतून खाली खेचल्याशिवाय राहणार नाही, असे खासदार यादव म्हणाले.

प्रदेशाध्यक्ष आझमी यांनी भाजप लव्ह जिहाद, वोट जिहाद, लँड जिहाद सांगून मुस्लिम धर्मियांना बदनाम करण्याचे काम करीत आहे. हिंदू-मुस्लिम भाईचारा नष्ट करण्याचे काम करीत आहे. धुळ्यात समाजवादी पक्षाचे हात बळकट करावे, असे आवाहन केले. इर्शाद जहागीरदार यांनी समाजवादी पक्षातर्फे रोजगार, शिक्षण, आरोग्याचे व्हीजन अमलात आणताना विकासाचा प्रश्न, भ्रष्टाचार मुक्त शहराचे स्वप्न साकारले जाईल, असे सांगितले.

## विकासाच्याथापामारणाऱ्याआमदारांना जनता कंटाळली- स्नेहल जगताप

तेजस, धोंडीराम जाधव इत्यादी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माजी सरपंच ताई नथु पवार,बाळू पवार, नथु पवार, रामदास मुकणे, वनिता मुकणे, लीला मुकणे, दिलीप वाघे, गौरी वाघे, सुषमा वाघे, दिलीप वाघे, संदीप मुकणे, गणपत वाघे, दिलीप हिलम, काशीराम हिलम, रवींद्र हिलम, सोमनाथ वाघमारे, रोहन पवार, राकेश मुकणे, नारायण वाघमारे, चंद्रकांत वाघमारे, रामा वाघमारे यांच्यासह संपूर्ण आदिवासी वाडीने शिंदे गटाला अखेरचा जय महाराष्ट्र करीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

## दिल्लीत सीआरपीएफ शाळेच्या भिंतीजवळ स्फोट

करणाऱ्या पथकाला घटनास्थळी पांढऱ्या रंगाची पावडर सापडली आहे. भिंतींवरही या पावडरचे कण सापडले आहेत. फॉरेन्सिक टीम या पावडरची तपासणी करत आहे. हा विस्फोटक पदार्थ होता का? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. तर काही सूत्रांनी म्हटलं आहे की, गावठी स्फोटकांच्या मदतीने हा स्फोट घडवून आणला असावा.

सणासुदीच्या काळात राजधानी दिल्लीत झालेल्या या स्फोटामागे दहशतवादी कट होता का? किवा हा स्फोट म्हणजे एखाद्या कटाची तयारी होती का? ते दखील तपासलं जात आहे. ही कुठल्या हल्ल्याची तयारी होती का हे शोधण्यासाठी पोलीस व एनएसजीचं पथक गुप्तचर यंत्रणांबरोबर काम करत आहेत. न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेचं (एफएसएल) पथक घटनास्थळावरील प्रत्येक संशयास्पद वस्तूची तपासणी करत आहे.

सुरुवातीला हा सिलेंडरचा स्फोट असावा, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, हा सिलेंडर स्फोट नसल्याचं तपासात उघड झालं आहे. तसेच पोलीस या भागातील सीसीटीव्ही फूटेज तपासत आहेत.

## उमेदवाराला खर्च मर्यादा ४० लाखांची

येत्या मंगळवारपासून (दि.२२) उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरूवात होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून मतदान होईपर्यंतचा खर्च उमेदवाराला निवडणूक आयोगाला सादर करावा लागतो. उमेदवाराने केलेला खर्च आणि सादर केलेले खर्चाची निवडणूक शाखेकडून पडताळणी केली जाते. यंदा निवडणूक आयोगाने वाढती महागाई लक्षात घेऊन उमेदवाराला ४० लाखांपर्यंत खर्च करण्याची मुभा दिली आहे. यापूर्वी ही मर्यादा २८ लाखांची होती. यंदा यामध्ये १२ लाखांची वाढ करण्यात आली आहे. बैठका, रॅली, सभा आणि जाहिराती, पोस्टर्स, वाहनांचा खर्च आदींचा यामध्ये समावेश आहे. उमेदवाराला प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांसाठी चहापान, जेवण, सभा, प्रचारासाठी वाहन, रॅली, जाहिरात आदी बाबींवर खर्च करावा लागतो. हा खर्च निवडणूक आयोगाच्या अधीन राहून करावा लागतो. यासाठी जिल्हा निवडणूक शाखेने खर्चाचे दर निश्चित केले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल केल्यापासून हा खर्च ग्राह्य धरला जातो. यासाठी उमेदवाराला राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकेत खाते उघडू शकतो. उमेदवारी अर्ज भरताना खर्चाच्या नोंदीसाठी रजिस्टर दिले जाते. त्या रजिस्टरमध्ये उमेदवारास निवडणूक काळातील खर्च, दैनंदिन खर्च नोंद करणे अनिवार्य असते.

# कर्जतमधील 'लाडकी बहीण' कोणाची ?

## ✻ महायुतीमधील घटक पक्षांमध्ये चुरस ✻ तिघांच्या भांडणात चौथ्याचा लाभ

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र शासनाच्या लाडकी बहीण योजनेमधून ५० हजारहुन अधिक लाभार्थी महिलांना शासनाकडून अनुदान मिळत आहे. ही योजना महाराष्ट्र शासन राबवत असून राज्यात भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) हे सत्तेत आहेत. मात्र, कर्जत मतदारसंघात या तिन्ही पक्षांची वेगेवेगळी भूमिका असल्याने याचा लाभ चौथ्याच होणार असून या मतदारसंघात लाडकी बहीण कोणाला साथ देणार, यावर निवडणुकीचे निकाल



अवलंबून राहणार आहेत.

कर्जत मतदारसंघात राज्य सरकारची जनाधार लाभलेली 'लाडकी बहीण योजना' मोठ्या प्रमाणात राबविली गेली आहे. हि योजना राबविण्यासाठी राज्यात सत्तेवर असलेल्या शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी आपल्यापरीने कर्जत आणि खालापूर तालुक्यात शिबीर भरून जोरदार प्रयत्न केले होते. कर्जत तालुक्यात तब्बल ५३ हजार लाडक्या बहिणी शासनाचे १५०० रुपये येत आहेत.

मात्र, त्याच लाडकी बहीण योजनेचे श्रेय घेण्यासाठी महायुतीमध्ये चुरस निर्माण झाली आहे. कर्जतचे विद्यमान आमदार हे शिवसेनेचे असून त्यांनी मोठी मोर्चे बांधणी केली आहे. तसेच, शासनाची ही योजना यशस्वी व्हावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून जोरदार मोहीम हाती घेतली होती. मात्र, योजनेच्या माध्यमातून लाभ दिलेल्या महिलांच्या संपर्कासाठी कोणतेही मेळावे आयोजित करतांना दिसत नाही. यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान नेते अपक्ष किंवा आघाडीमधून लढले तर ते लाडकी बहीण योजनेचा लाभ कसा उठवणार, याबाबत अधिकृत उमेदवार यांच्यासाठी अडचणी निर्माण होणार आहेत.

परंतु, लाडकी बहीण योजना ही राज्यसरकारच्या महिला बालकल्याण मंत्रालयकडून राबविली जात असून निधीची कमतरता भासणार नाही याची काळजी राज्याचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे. भाजपकडून फडणवीस यांना लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून प्रोजेक्ट केले जात आहे. तर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लाडक्या बहिणींचा तारणहार म्हणून पुढे केले जात आहे. मात्र, महायुतीतील घटक पक्षांच्या चुरसीचा फायदा चौथाच करून जाणार अशा चर्चा कर्जतमध्ये रंगू लागल्या आहेत. यामुळे कर्जतमध्ये लाडक्या बहिणी आपल्या मतांची ओवाळणी कोणाच्या पारड्यात टाकणार, यावर देखील या मतदारसंघाचे भवितव्य अवलंबून आहे.

# प्राचार्यपदी ठक्कर यांची नियुक्ती



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील फुंडे रयत शिक्षण संस्थेच्या महालण विभाग येथील वीर वाजेकर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. आमोद ठक्कर यांची दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून नेमणूक झाली आहे. डॉ. आमोद ठक्कर हे गेले तीन दशके वीर वाजेकर महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाचे प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. यावेळी, पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष माजी आमदार बाळाराम पाटील, महाविद्यालय विकास समिती सदस्य, रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्राचार्य डॉक्टर गणेश ठाकूर, भावना घाणेकर, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर धरत, महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शिरवलीतून जोडपे बेपत्ता

**। वावोशी । वार्ताहर ।**

वावोशी पोलीस दुरक्षेत्राच्या हद्दीतील शिरवली आदिवासी वाडीतील संतोष वाघमारे (३५) व सुवर्णा जाधव (३०) हे दोघेही बेपत्ता आहेत. संतोष व सुवर्णा राहणार शिरवली आदिवासी वाडी हे दोघेही रविवारी (दि.६) रात्री नऊ वाजताच्या दरम्यान घरात कोणास काही न सांगता अचानक गायब झाले आहेत. या घटनेला तब्बल १५ दिवस होत आले असून त्यांच्या नातेवाईक, मित्रमंडळीकडे जाऊन चौकशी केली तरी देखील त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. तरी पोलीस या महिला आणि पुरुष यांचा कसून तपास करत असून हे दोघेही आपल्या गावात अगर आजूबाजूचे परिसरात निदर्शनास आल्यास तात्काळ वावोशी दुरक्षेत्र व खालापूर पोलीस ठाणे यांना संपर्क करावा, अशी विनंती सर्व नागरिकांना करण्यात आली आहे.



● दिवाळी सुट्टीत लहान मुले मातीचे किल्ले बनवत असतात. परंतु, माती मिळत नसल्याने प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनवलेल्या किल्ल्यांना जास्त मागणी आहे. म्हणून असे विविध आकाराचे किल्ले बाजारात विक्रीसाठी आले असून २५० रुपयांपासून हजार रु. किमतीपर्यंत हे किल्ले विकले जात आहेत. तसेच, विविध प्रकारचे व आकाराचे चिनी मातीपासून बनवलेल आकर्षक दिवे अलिबाग बाजारपेठेत विक्रीसाठी आले आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

# महाडच्या दुर्गांची मोठी झेप

**। पाली । वार्ताहर ।**

कोरोना संकटकाळात अनेक व्यवसाय व उद्योग डबघाईला आले होते. मात्र, या संकटकाळात संधी शोधून महाड येथील दोन महिलांनी लघुउद्योग सुरु केला होता. आणि बघताबघता साबण, जेल व क्रीमचा 'ॲलोवेंदा ब्रँड' विकसित केला. त्यांच्या माध्यमातून अनेकांना रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध झाल्या आहेत. महाड येथील पूजा खेडेकर व सुप्रिया स्वामी यांनी कोणताही व्यवसायिक अनुभव नसताना स्वतःचा एक ब्रँड उभा करून मोठी झेप घेतली आहे. सुरवातीला ४ ते ५ प्रकारचे उत्पन्न घेत होते. मात्र, आता ५५ प्रकारचे उत्पन्न त्या घेत आहेत. यामध्ये १४ प्रकारचे साबण असून ग्राहकांच्या मागणीनुसार बनवून दिला जातो.



त्यांच्या या कार्याबद्दल दोघींनाही अनेक पुरस्कार मिळाले आहेत. व्यवसायाच्या वर्षपूर्तीला युनाइटेड मराठी इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सच्यावतीने सन्मानित करण्यात आले. पूजा खेडेकर यांना शुक्रवारी (दि.४) महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्याकडून 'उत्कृष्ठ महिला उद्योजिका' हा पुरस्कार मिळाला आहे. याआधी देखील दोघींना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

## आदिवासी लोकांसोबत दिवाळी साजरी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मुंबई येथील ईशार्जून फाऊंडेशन यांच्याकडून कर्जत तालुक्यातील कळंब ग्रामपंचायत मधील सुतारवाडी आदिवासी वाडी मधील ७० कुटुंबांसाठी दिवाळी साजरी करण्यासाठी लागणारे सर्व जिन्नस भेट देण्यात आले. याचवेळी ईशार्जून फाऊंडेशनकडून या आदिवासी वाडीमध्ये स्थानिक मुलींसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. हा उपक्रम कर्जत प्रेस असोसिएशनच्या सामाजिक बांधिलकी प्रकल्पाचा पुढाकार होता. या कार्यक्रमाला माधुरी बुधवानी, मोनिका माता, दृष्टी माता, संतोष पेरणे, भूषण प्रधान, दीपक बोराडे, रोशन दगडे, कैलास म्हमले, रामदास माळी, जगदीश झांजे, निरगुडे आदी उपस्थित होते.

# कर्तृत्ववान कन्यांचा सत्कार



**। उरण । वार्ताहर ।**

उरण बेलापूर रोडवर असलेल्या श्री साई बाबा मंदिरात श्री साई देवस्थान तर्फे दर गुरुवारी विविध कार्यक्रम राबविले जातात. याखेरीज विविध शेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात येतो. यावेळी गुरुवारी (दि.१७) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान, सृष्टी राजेंद्र मुंबईकर व वैभवी महेंद्र सोमासे यांचा सन्मान करण्यात आला.

सृष्टी मुंबईकरची वयाच्या १९ व्या वर्षी भारतीय मर्चन्ट नेव्हीमध्ये निवड झाली आहे. तब्बल १३५ वर्षानंतर प्रथमच भारतीय मुलींना मर्चन्ट नेव्हीमध्ये भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी देशभरातील ३ हजार ५०० मुलींमधून महाराष्ट्रातून फक्त १९ मुलींची निवड झाली. यामध्ये उरण तालुक्यातील सृष्टी मुंबईकरची निवड करण्यात आली. तसेच, रायगड जिल्ह्यात रयत शिक्षण संस्थेच्या जेवढ्या शाळा आहेत त्यात उलवे येथील शकुंतला रामशेठ माध्यमिक विद्यालयातील इयत्ता नववीत शकत असलेली विद्यार्थिनी वैभवी सोमासे हिने संपूर्ण रायगड जिल्ह्यात आदर्श विध्यार्थिनी पुरस्कार मिळविला आहे. याबद्दल सातारा या ठिकाणी तिचा सत्कार करण्यात आला होता. या यशा बद्दल या दोन्ही मुलींचा सााई देवस्थान वहाल तर्फे सत्कार करण्यात आला.

## पतसंस्था टिकवण्याची जबबादारी सभासदांची : वटाणे

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

कोणत्याही पतसंस्थेला आपल्या सभासदांचे मोलाचे सहकार्य अपेक्षित असते. सभासदांनी चांगले योगदान दिले तरच पतसंस्था चालतात. यासाठी ठेवी वाढवून भागभांडवल वाढविणे गरजेचे असते. पतसंस्था टिकून राहणे ही पतसंस्थेच्या प्रत्येक सभासदाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन सहकार प्रशिक्षण पुणेचे प्रा. एस.बी. वटाणे यांनी मुरुडमध्ये बोलताना केले आहे.

श्री काळभैरव नागरी सहकारी पतसंस्था मुरुडच्या तिसाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पतसंस्थेने कर्जदार व ठेवीदारांची संख्या वाढवून भागभांडवल वाढवणे महत्त्वाचे आहे. तरच संस्था मोठी होईल. राष्ट्रीयकृत बँका छोट्या कर्जदारांना कर्ज देत नाहीत अशांना पतसंस्था तारणहार ठरतात. सहकार चळवळीत युवकांचा सहभाग वाढला पाहिजे. विद्यार्थ्यांनाही बचतीची सवय लावली पाहिजे, असेही ते पुढे बोलताना म्हणाले.

यावेळी आदित्य यादव, स्नेहामाई पाटील, सुरेश कासेकर, मनोहर कासेकर, निवास रसाळ, दीपक मयेकर, सुप्रेश खोत, भालचंद्र घुमकर, सुभाष पाटील, शंकर खेडेकर, संजय नाईक, पंचाक्षरी नाईक, रुपाली कारभारी व पतसंस्थेचे अन्य कर्मचारी आदी उपस्थित होते.

# मांडवा सागरी पोलिसांचे संचलन

**। सोगाव । वार्ताहर ।**

नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. यावेळी अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघातील मांडवा सागरी पोलिसांनी उपविभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.१९) सायंकाळी चोंढी व झिराड येथे संचलन केले.

हे संचलन चोंढी येथील स.म. वडके शाळा, चोंढी नाका, अपना बाजार, रेल्वे फाटक, मुख्य बाजारपेठ, चोंढी पूल असे काढण्यात आले. तसेच, झिराड येथील स्टेट बँक ऑफ इंडिया, वैभव हॉटेल, मुख्य बाजारपेठ, पाटील



### ■ आगामी निवडणूकीच्या अनुषंगाने पोलीस सज्ज

पोल्ट्री, मांडवा सागरी पोलीस ठाणे असे पदपथ संचलन करण्यात आले. यावेळी मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षकभोई, दुय्यम अधिकारी पोलीस उपनिरीक्षक खोत, पोलीस उपनिरीक्षक वाणी व १० अंमलदार, आरसीपी प्लाटून वडखळचे ३२ अंमलदार, सीआयएसएफचे ४६ जवान या संचलनात सहभागी झाले होते.

# सहसंवेदना ट्रस्टला तरूणांच्या आधाराची गरज

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

गरजू कुटुंबाला आधार देताना त्यांना महिन्याला लागणारा शिधा देण्याचे कार्य सहसंवेदना ट्रस्ट करीत आहेत. या संस्थेला पाच वर्षे झाली असून संस्थेचे अध्यक्ष आतापर्यंत १२५ कुटुंबीयांपर्यंत पोहचले आहेत. तसेच, तरुण वर्गाने या संस्थेने कार्य हाती घेऊन पुढे न्यावे, असे आवाहन ठाणे येथील स्वाद उद्योग समूहाचे बळवंत कर्वे यांनी केले.

नेरळ गावातील बापूराव धारप ट्रस्ट सभागृहात सहसंवेदना ट्रस्ट यांच्या देणगीदार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष सुधीर साने, सचिव मिलिंद साने, खजिनदार बाळ भूमकर, कर्वे आदी उपस्थित होते. ठाणे येथील स्वाद उद्योग




### ■ बळवंत कर्वे यांचे आवाहन

समूहाचे प्रमुख बळवंत कर्वे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, ट्रस्टचे नाव आकर्षक असून ज्या सर्वांना समजाची संवेदना आहे त्या सर्वांना एकत्र करण्याचे काम सहसंवेदना ट्रस्ट करीत आहे. तसेच, भारतभर संस्थेचे कार्य पोहचवण्याचे उद्दिष्ट ७४ वर्षीय सुधीर साने दाखवत आहेत. संस्थेने निवडलेले कार्य वेगळे असून ठाणे सारख्या शहरामध्ये असा विचार पुढे आला नाही. पण कर्जत सारख्या गावात हे कार्य सुरू झाले याचे कौतुक व्हायला हवे असे उद्गार बर्वे यांनी काढले.

## शासकीय यंत्रणेची मुक संमती असल्याचे चित्र

# उरणमध्ये तंबाखूजन्य पदार्थांची विक्री

**। उरण । वार्ताहर ।**

तंबाखूजन्य पदार्थ आरोग्यास हानिकारक असतात. यामुळे वेळप्रसंगी कर्करोग होऊन जिवाला देखील मुकावे लागते. हा धोका ओळखून महाराष्ट्र शासनाने २०१२ मध्ये गुटखा विक्रीवर बंदी घातली होती. मात्र, परराज्यातून दाखल होणार गुटखा किराणा दुकाने, पानटपऱ्यावर सर्रासपणे विकला जात आहे. गुटखा बरोबर काही ठिकाणी चरस, गांजाची विक्री देखील केली जात आहे. यामुळे कारवाईची जबाबदारी असणाऱ्या शासकीय यंत्रणेकडून याला मूक समंती असल्याचे चित्र आहे.



शाळा, पोलीस ठाणे, हॉस्पिटल जवळील टपरीवर गुटखा व इतर नशिली पदार्थांची खुलेआम विक्री होत आहे. यामुळे उरण शहरातील व तालुक्यातील तरुण पिढी याच्या आहारी गेली आहे. यामुळे पालक वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे. इतर तालुक्यात लाखों रुपयांचा गुटखा विकला जात असताना पकडला जातो. मात्र, उरणमध्ये आजतागायत गुटखा किंवा इतर नशिली पदार्थांचा साठा कधी पकडला जाईल, अशी चर्चा जनतेत सुरू आहे.

उरणमधील टपरी धारक व गुटखा होलसेल हे मध्यरात्री पर्यंत दुकान उघडे ठेऊन गुटख्याची विक्री करत असतात. तर, दुचाकीच्या डिकीत ठेऊन गुटख्याची विक्ती करत असतात. दरम्यान, एका गुटखा विक्रत्याने भाड्याची टपरी चालवून द्रोणागिरी नोडमध्ये मोठा गाला व सदनिका खरेदी केली आहे. यापूर्वी त्याच्यावर कारवाई होऊन काही दिवसांनी सुटका झाल्यानंतर पुन्हा जोमाने गुटखा विक्री सुरू केली आहे.

### पान टपऱ्यांसमोर पुड्यांचा खच

पान टपऱ्यामध्ये गुटखा पुडीची माळ लटकावून ठेवण्याचा प्रकार बंद झाला आहे. मात्र, कुठेही गुटखा पुडी मागितल्यास ती एमआरपीपेक्षा अधिक दर घेऊन तात्काळ कागदामध्ये गुंडाळून ग्राहकांच्या हाती दिली जाते. तसेच, पान टपऱ्यांसमोर रिकाम्या गुटख्याच्या पुड्यांचा खच पडलेला दिसतो. मात्र, यावर कोणतीच कारवाई होत नाही.

### कारवाईची मागणी

पान टपऱ्यापर्यंत व छोट्या-मोठ्या ठेल्यापर्यंतच्या वितरणाबाबत कमालीची गुप्तता पाळली जात आहे. शहरासह ग्रामीण भागात गुटख्याच्या व्यवहारातून लाखों रुपयांची उलाढाल होत असते. मात्र, हा व्यवहार चालतो कसा हे जाणून संबंधित विभागाने कारवाई करावी, अशी नागरिकांकडून मागणी होत आहे.

तसेच, आम्ही अन्न व औषध प्रशासन विभाग आणि इतर अधिकाऱ्यांना नियमित पाकीट देत असल्याने ते कारवाई करू शकत नाहीत, अशी दरपोक्ती उरणमधील गुटखा माफिया व विक्रेते करीत आहेत.

# सरकारी, अनुदानित शाळांना बळ

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (एससीईआरटी) तिसरी ते बारावीपर्यंतच्या राज्य अभ्यासक्रम आराखड्याला सुकाणू समितीने नुकतीच मान्यता दिली आहे. या आराखड्यामुळे पटसंख्येत होणाऱ्या गळतीमुळे संकटात सापडलेल्या सरकारी, अनुदानित शाळांना बळ मिळेल, असे मत शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांसोबत शिक्षक प्रतिनिधींनी व्यक्त केले आहे.

शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक प्रतिनिधी यांची मते विचारात घेत सरकारी, अनुदानित आणि इतर सर्व माध्यमांच्या शाळांमध्येही बारावीपर्यंत मराठी तर दहावीपर्यंत इंग्रजीचा विषय अनिवार्य केला आहे. या आराखड्याला सुकाणू समितीच्या मान्यतेमुळे सीबीएसईच्या धरतीवर विज्ञान, गणित, इंग्रजी आणि हिंदीसह व्यावसायिक विषयांसाठीचा पॅटर्न राज्यातील सरकारी, अनुदानित शाळांमध्ये राबवला जाणार आहे. या निर्णयामुळे संकटात सापडलेल्या सरकारी, अनुदानित शाळांना मोठा लाभ होईल, असा दावा तज्ज्ञांनी केला आहे. शाळांमधील मुले राष्ट्रीय स्तरावरील विविध प्रकारच्या परीक्षांच्या स्पर्धेत उतरतील. पहिलीपासून हिंदीचा समावेश केल्यास कोणतीही अडचण होणार नाही, असा दावा केला जात आहे.

# भारतावर ठपका

भारत आणि कॅनडा यांच्यात शाब्दिक मारामारी चालू असतानाच अमेरिकेने भारत सरकारवर एक बाँबगोळा टाकला आहे. अमेरिकेत राहणारा खलिस्तानवादी गुरपतवंत पन्नून याच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी विकास यादव नावाच्या एका माजी भारतीय अधिकाऱ्यावर आरोप ठेवण्यात आला आहे. यादव हा पूर्वी रॉ या आपल्या गुप्तचर यंत्रणेत कार्यरत होता. ही गुप्तचर यंत्रणा थेट अमित शाह व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या अखत्यारीत येते. अमेरिकेसारख्या परक्या भूमीवर एखाद्याची हत्या करण्यासाठी सुपारी देण्याचे काम गुप्तचर यंत्रणेचा अधिकारी सरकारच्या संमतीखेरीज करूच शकत नाही. याचाच अर्थ हत्येच्या प्रयत्नाचा हा आरोप थेट मोदींच्या भारत सरकारवरच आहे. हा आरोप खरा आहे का व न्यायालयात तो सिध्द होऊ शकेल का हे पुढचे प्रश्न आहेत. मात्र या खटल्यामुळे भारत सरकारची अब्रू गेली आहे यात शंका नाही. अमेरिकी पोलिसी यंत्रणांनी एकाएकी ही कारवाई केलेली नाही. गेल्या अनेक महिन्यांपासून याबाबत चर्चा चालू आहे. भारत सरकारने याबाबत सहकार्य करावे अशी अधिकृत विनंतीही करण्यात आली होती व भारत सरकारचे अधिकारी अमेरिकेसोबत सहकार्य करीत होते. आता ज्याअर्थी खटला दाखल करण्यापर्यंत मजल गेली आहे त्याअर्थी अमेरिकेच्या हातात सबळ पुरावे आहेत असे गृहित धरायला हवे. आता न्यायालयात खटल्याच्या दरम्यान अधिक गोष्टी बाहेर येतील. त्या कदाचित भारत सरकारला अधिक गैरसोयीच्या असतील. अंतिमतः खटल्याचा निकाल काहीही लागला तरी भारत सरकारवरचा डाग सहजासहजी पुसला जाणार नाही. इतके दिवस आपण पाकिस्तानवर परदेशात दहशतवाद पसरवत असल्याचा आरोप करीत होतो. २६ नोव्हेंबर २००८ च्या मुंबई हल्ल्यातला आरोपी कसाबचा खटला चालवून आपण त्याचा पुरावा जगासमोर ठेवला. कसाब व त्याचे सहकारी पाकिस्तानातून प्रशिक्षण घेऊन आले होते व पाकिस्तानात बसलेले सूत्रधार हल्ल्याचे लाईव्ह दिग्दर्शन करीत होते हे या निमित्ताने उघड झाले.

### प्रतिष्ठा धोक्यात

पाकिस्तानातील बलुचिस्तानात आपण तेथील फुटिरतावाद्यांना आपण मदत करतो अशा तक्रारी झाल्या होत्या. पण त्याला पुरावे नव्हते. मात्र आता परदेशातील खलिस्तानवाद्यांना ठार मारण्याचे सत्र भारताने आरंभले आहे असे चित्र या खटल्यामुळे उभे राहत आहे. कॅनडाचा नागरिक असलेला खलिस्तानवादी निज्जर याची जून २०२३ मध्ये कॅनडात हत्या झाली होती. ही हत्याही भारताने घडवून आणल्याचे आरोप होत होते. गेल्या वर्षी कॅनडाचे पंतप्रधान ट्रुडो यांनी संसदीय समितीसमोर साक्ष देताना तसे म्हटले होते. आमच्याकडे ठोस पुरावे नसले तरी गुप्तचर यंत्रणांकडे याबाबत खात्रीलायक माहिती आहे असे ट्रुडो यांचे म्हणणे होते. ते प्रकरण आता चिघळले आहे. या हत्येची भारतीय उच्चायुक्त व दूतावासातील अधिकाऱ्यांना माहिती होती असा गंभीर आरोप अलिकडेच ट्रुडो सरकारने केला व या अधिकाऱ्यांना कॅनडा सोडून जाण्यास सांगितले. हा अत्यंत गंभीर आरोप होता. भारताची जगातील प्रतिमा शांततावादी व जबाबदार देश अशी आहे. एखाद्या हत्या प्रकरणात भारतीय दूतावासातले अधिकारी अप्रत्यक्षपणे गुंतलेले असल्याचा आरोप करून त्यांना हाकलून लावण्याची ही पहिलीच वेळ होय. यापूर्वी पाकिस्तानने काही वेळा अशा कारवाया केल्या आहेत. मात्र तो आपला शत्रूदेश असल्याने त्याबाबत कोणाला नवल वाटत नाही. कॅनडाने हे केल्याने आपल्या प्रतिष्ठेला मोठा धक्का बसला आहे. याला प्रत्युत्तर म्हणून भारतानेही कॅनडाच्या अधिकाऱ्यांना परत धाडले व कॅनडाचे आरोप फेटाळून लावले. मात्र कॅनडाने हे आरोप कायम ठेवले असून त्याला आता अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया या देशांनीही पाठिंबा दर्शवला आहे. या देशांची फाईव्ह आईज नावाची एक संयुक्त गुप्तचर यंत्रणा आहे. या यंत्रणेकडे भारताच्या या हत्येतील सहभागाबाबत खात्रीशीर माहिती आहे असे कॅनडाचे म्हणणे आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.

### गावठी जेम्स बाँड

भारत सरकार याबाबत आरंभापासून टोलवाटोलवी करीत आहेत. निज्जर हा एक अतिरेकी होता व त्याला तसेच इतरांना भारताच्या हवाली करावे अशी भारताची पूर्वापार मागणी होती. मुद्दा असा आहे की, तो अतिरेकी असला तरी त्याचे गुन्हे सिध्द व्हायचे होते. शिवाय तो कॅनडाचा अधिकृत नागरिक होता. त्यामुळे त्याची हत्या हा तेथील सरकारसाठी गंभीर विषय आहे. त्यातच कॅनडातील निवडणुका लवकरच होणार आहेत. तेथील शीख समुदायाची संख्या मोठी आहे. त्यामध्ये हा भावनिक मुद्दा बनला आहे. ट्रुडो सरकार त्यांना दुखवू इच्छित नाही. हे सर्व मुद्दे योग्य असले तरी निज्जर किंवा अशा कोणाचीही आपण तेथे जाऊन हत्या करू शकत नाही. उद्या त्याच न्यायाने पाकिस्तान, अमेरिका किंवा बांगलादेशी लोक येथे येऊन कोणाचीही हत्या करू शकतील व आपल्याला काही बोलता येणार नाही. त्यामुळे भारत सरकार असल्या गोष्टींना फूस देत असेल तर ते त्याने तात्काळ थांबवले पाहिजे. २०१९ च्या यशानंतर मोदी सरकारचा उन्मत्तपणा वाढला होता. पाकिस्तानात जाऊन काही दहशतवाद्यांचा खातमा आपण केला असल्याचे सांगितले जाऊ लागले होते. गावठी जेम्स बाँड अजित डोवाल यांचे नाव यासाठी घेतले जात होते. त्याच धर्तीवर अमेरिका, कॅनडा व ब्रिटनमधील खलिस्तानवाद्यांना मारण्याची योजना आपल्या गुप्तचर यंत्रणांनी आखली असावी असे एकूण बातम्यांवरून दिसते. अमेरिकेने जो खटला विकास यादववर भरला आहे त्याने भारतात बसून हत्येचा कट रचल्याचा आरोप आहे. त्यासाठी त्याने निखिल गुप्ता नावाच्या एका मारेकऱ्याला सुपारी दिली. त्याने अमेरिकेतील पिस्तुलबाज गाठले. पण ते नेमके तेथील गुप्तचर यंत्रणांसाठी काम करणारे डबल एजंट होते. त्यामुळे या सर्व कारस्थानाचा गौप्यस्फोट झाला व अमेरिकी यंत्रणांकडे सज्जड पुरावा गोळा झाला. यामुळे भारत सरकार याबाबत गप्प आहे. कॅनडाच्या विरोधात आपण जोरजोराने बोलत आहोत. पण अमेरिकेने आपले तोंड बंद केले आहे. भारतावरचा हा ठपका हे चांगले लक्षण नाही.

विचार

# पंजाबचे वाळवंट?

***'ग्रेन बाऊल' म्हणून ओळखला जाणारा पंजाब भारतीय शेतीचा आधारस्तंभ आहे. तिथली सुपीक माती आणि समर्पित शेतकरी दरवर्षी लाखो टन धान्याचे उत्पादन करतात, जे भारताच्या अन्न गरजा पूर्ण करतातच पण निर्यातीतही योगदान देतात. असे असले तरी हवामानबदल, पाण्याचा अतिवापर आणि जमीन वापरातील बदल यासारख्या घटकांमुळे पंजाबच्या शेतजमिनीला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता समोर आली आहे.***



**प्रा. अशोक ढगे**

शेतीमध्ये उच्च उत्पादन मिळवण्यासाठी पंजाबमध्ये नायट्रोजन, फॉस्फेट आणि पोटॅश यासारख्या खतांचा सर्वाधिक वापर केला जातो. केंद्रीय रसायन आणि खते मंत्रालयाने ६ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, पंजाबने २०२३-२४ मध्ये प्रति हेक्टर २४७.६१ किलो खताचा वापर केला. हे प्रमाण राष्ट्रीय सरासरी (१३९.८१ किलो प्रति हेक्टर) च्या जवळपास दुप्पट आहे. पंजाबमध्ये भारतातील केवळ १.५३ टक्के कृषी क्षेत्र असले, तरी देशात वापरल्या जाणाऱ्या एकूण खतांपैकी नऊ टक्के खतांचा वापर होतो. आकडेवारीनुसार, एनपीके (नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम) खतांचा वापर गेल्या चार दशकांमध्ये (१९८०-२०१८) १८० टक्क्यांनी वाढला आहे. याच चार दशकांमध्ये एकट्या पंजाबमध्ये युरिया (नायट्रोजन)चा वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. त्याच अहवालानुसार भात आणि गव्हासाठी युरियाचा वापर अनुक्रमे ०.९ क्विंटल आणि १.१ क्विंटल प्रति एकर (०.४ हेक्टर) असावा; परंतु येथिल शेतकरी साधारणपणे यापेक्षा ०.४-०.६ क्विंटल अधिक वापरतात. १९८० ते २०१८ दरम्यान राज्यात खतांच्या वापरामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. याउलट या काळात धानाच्या उत्पादनात केवळ ६८ टक्के तर गव्हाच्या उत्पादनात ८५ टक्के वाढ झाली आहे. याशिवाय भूजल पातळीतही सातत्याने घट होत असल्याने शेतकऱ्यांना पाण्यासाठी ५०० फुटांपर्यंत कूपनलिका खोदावी लागत आहे. हरित क्रांतीने भारताला अन्न उत्पादनात स्वयंपूर्णतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यास मदत केली; परंतु त्याचे कृषी आणि पर्यावरणावर गंभीर दुष्परिणाम झाले. या क्रांतीचा सर्वात मोठा परिणाम पंजाबमध्ये दिसून येत आहे.

पंजाबमध्ये पहिल्यापासूनच भात आणि गव्हाच्या लागवडीला प्राधान्य दिले गेले. या एकतर्फी दृष्टिकोनामुळे शेतकरी या पिकांवर जास्त अवलंबून आहेत, परिणामी कृषी विविधता कमी झाली आहे. याव्यतिरिक्त, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर धोका आहे. पंजाबमध्ये पूर्वी मका, बाजरी, ज्वारी, कडधान्ये, तेलबिया आणि भाजीपाला तसेच दुग्धजन्य पदार्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत होते. यामुळे शेतकरी कुटुंबांना स्थिर उत्पन्न आणि संतुलित अन्न उपलब्ध झाले. या बहुआयामी शेतीव्यवस्थेने शेतकऱ्यांना स्वावलंबी ठेवले. त्यामुळे ते बाजारपेठेवर कमी अवलंबून राहिले. १९८० च्या दशकापूर्वी, शेतकरी काडेपेटी, मीठ आणि मसाले यासारख्या छोट्या वस्तू बाजारातून विकत घेत असत, कारण ते त्यांच्या शेतीतून इतर सर्व गरजा भागवत. त्या काळात शेतीमुळे जमिनीची सुपीकता तर राहिलीच; शिवाय शेतकरी कुटुंबांचे आरोग्यही राखले गेले. म्हणूनच जास्त भात आणि गहू पिकवल्याने पंजाबची शेती वाळवंटात बदलत आहे का, असा प्रश्न आता उत्पन्न होत आहे. पंजाबच्या शेतांना वाळवंटात बदलण्यात भात आणि गव्हाच्या अतिशेतीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अधिकृत अहवालांनुसार, जास्त निचरा, जमिनीची गुणवत्ता ढासळणे आणि रासायनिक खतांचा अतिवापर यामुळे येथिल जमिनीची सुपीकता कमी झाली आहे.

पंजाब कृषी विभागाच्या अहवालात हे स्पष्ट करण्यात आले आहे, की हवामानबदल आणि अस्थिर मॉन्सूनमुळे जलसंकट अधिक गडद होत आहे. त्यामुळे शेतजमिनीच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. दीर्घकालीन मोनोक्रॉपिंग पद्धतींमुळे मातीची विविधता नाहीशी झाली असून जलस्रोतांवर दबाव वाढला आहे. या परिस्थितीमुळे योग्य उपाययोजना न केल्यास पंजाबमधील शेतीची जमीन एक दिवस अक्षरशः वाळवंटी भागात बदलू शकते.

देशासाठी अन्नधान्य निर्माण करणाऱ्या पंजाबचे वाळवंट होण्यामागे काही कारणे आहेत. एकाच पिकाची (जसे भात आणि गहू) सतत वाढ केल्याने जमिनीतील पोषक तत्वांची विविधता कमी होते. त्यामुळे जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो. या पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर वाढवला आहे. रासायनिक खतांचा दीर्घकाळ वापर केल्याने जमिनीतील संतुलन बिघडते आणि नैसर्गिक सुपीकता कमी होते. भातशेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. यामुळे भूजल पातळी कमी होते आणि पाण्याचे संकट निर्माण होते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. सतत पीक घेतल्याने मातीची धूप वाढते. त्यामुळे त्याची रचना आणि पोषण कमी होते. पीक विविधतेच्या अभावामुळे कीड आणि रोगांचा दबाव वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक कीटकनाशके वापरण्यास भाग पाडले जाते. त्याचा परिणाम माती आणि पाण्याच्या स्त्रोतांवरही होतो.

वस्तुत: शेतकऱ्यांना धान आणि गव्हाऐवजी डाळी, तेलबिया किंवा फळे आणि भाजीपाला यासारखी इतर पिके घेण्यास प्रवृत्त केल्यास जमिनीची सुपीकता वाढेल आणि फायदेही मिळतील. जमिनीच्या गुणवत्तेनुसार खतांची निवड करून समतोल वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना जागरूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते. पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन तंत्राचा वापर करण्यावर भर दिल्यास भूजल पातळीत सुधारणा होईल. सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब केल्यास जमिनीची सुपीकता राखण्यात मदत होऊ शकते. शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान आणि पद्धतींबद्दल शिक्षित करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. आकडेवारीनुसार, गेल्या चार दशकांमध्ये (१९८०-२०१८ दरम्यान) एनपीके खतांचा वापर १८० टक्क्यांनी वाढला आहे. त्याच वेळी, १९८० ते २०१८ या काळात केवळ युरियाचा (नायट्रोजन) वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. येथे शेतात खतांचा अतिवापर होणे हे आता गुपित राहिलेला नाही. शेतकरी खतांचा वापर एका रात्रीत कमी करू शकत नाहीत. ही प्रक्रिया वर्षानुवर्षे संथपणे चालत असावी, अन्यथा उत्पादनात मोठी घट होईल. यानंतर कीटकनाशकांचा क्रमांक येतो. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रानंतर पंजाब हे रासायनिक कीटकनाशकांचा देशातील तिसरा सर्वात मोठा ग्राहक आहे. खतांसोबतच कीटकनाशकांचा वापरही वाढतो.

खतांच्या अतिवापरामुळे वनस्पतीवृद्धी वाढते. म्हणजेच पीक गडद हिरवे होते. त्यामुळे कीटकांचे आक्रमण आणि रोग अधिक आकर्षित होतात. पानातील द्रवपदार्थ हे कीटकांचे अन्न आहे. पान जितके जाड असेल, तितके कीटक आणि कृमींचे अन्न जास्त असते. बर्नाला जिल्ह्यात वसलेले पट्टी खट्टर हे गाव सतलज नदीच्या दक्षिणेस पंजाबच्या माळवा भागात आहे. 'सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्ड'च्या मूल्यांकनानुसार, येथिल बहुतांश ब्लॉक्स 'डार्क' झोनमध्ये येतात. ते भूजलाच्या अति-शोषणाची पातळी दर्शवतात. तांदळामुळे पंजाबचे खूप नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्याचे वाळवंटात रुपांतर होत आहे. पंजाबमध्ये १४ लाख कूपनलिका भातपिकाच्या हंगामात आठ तास चालतात. एक हेक्टर जमिनीवर एक इंच पाणी म्हणजे एक लाख लिटर. पंजाबमध्ये भाताच्या हंगामात किमान ४-५ इंच पाणी साचत राहते. दर वर्षी राज्यातील पाण्याची पातळी ३-५ फुटांनी घसरते. भूजल पातळी कमी होण्याचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय समितीने २०२१ मध्ये भूजल उत्खननाची सध्याची प्रवृत्ती कायम राहिल्यास पुढील २५ वर्षांमध्ये राज्य वाळवंटात बदलेल, असा अंदाज वर्तवला आहे. वाढत्या लोकसंख्येला पोसण्याच्या गरजेने भारतात हरितक्रांतीची सुरुवात झाली आणि त्यासोबतच तांदूळ गहू पीक प्रणाली आली. तिथे एकाच जमिनीवर वारंवार ही पिके घेतली जातात.

१९६० पासून सादर केलेल्या उच्च-उत्पादक वाणांनी भारताला अन्न सुरक्षा प्राप्त करण्यास मदत केली आणि ती राखण्यात मोठी भूमिका बजावली. अनुदानित खतांमुळे याला आणखी चालना मिळाली आणि पंजाब हा देशातील सर्वाधिक लागवडीचा प्रदेश बनला. यामुळे शेतीतील भुस्सा जाळण्याचे प्रमाण वाढले. परिणामी, मातीतील सूक्ष्मजीव क्रियाकलाप बिघडला आणि जमिनीतील मायकोरिझा (एक प्रकारची बुरशी) नष्ट झाली. मातीमध्ये मायकोरिझाईची भूमिका वनस्पतींच्या मुळांना अधिक पोषक द्रव्ये शोषण्यास मदत करते. पंजाब आणि हरियाणामध्ये दर वर्षी ऑक्टोबरचा उत्तरार्ध ते नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत भाताचे कापणीनंतरचे अवशेष जाळण्याचे प्रमाण व्यापक आहे, कारण शेतकऱ्यांना १०-१५ दिवसांच्या कालावधीत भात कापणी आणि गहू पेरणे आवश्यक असते. मायकोरायझी नायट्रोजनचे अमोनियममध्ये रूपांतर करतात, जे झाडे शोषून घेतात आणि वापरू शकतात. २०२२ मध्ये पंजाब कृषी विद्यापीठाने मातीचाचणी केली तेव्हा जमिनीत पोटॅशचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. ही समस्या खूप गंभीर आहे. अशा अनेक समस्यांवर मात करण्याचे आव्हान पंजाबपुढे आहे आणि ते क्लौशल्याने पेलावे लागणार आहे.

आजकाल

# निवडणुका आणि मराठी टीव्ही मालिका

**निमिष साने**

अन्य जातीचे लोक, परधर्मीय, परप्रांतीय, इतर भाषा बोलणारे लोक यांचा अनेक जण मनापासून द्वेष करतात. 'त्यांना' धाकात ठेवलं आणि 'आपली' सत्ता आली, की सगळे प्रश्न सुटणार आहेत असं लोकांना वाटतं. पण तुम्ही मराठी मालिका पाहा.

बहुतांश मराठी मालिकांमधली बहुतांश पात्रं सवर्ण हिंदू आहेत. त्यांच्यात आंतरजातीय लग्नही फार दिसत नाहीत. बहुतांश कुटुंबं एकाच जातीची असतात. त्यांचा जगातल्या इतर कुठल्याच समुदायाशी संवाद नसतो. कथेत तरी ती आपल्याच गोतवळ्यात गुरफटलेली असतात. हे लोक मालिकांमध्ये झाडून सगळे सणवार साग्रसंगीत करत असतात. ते सणही तथाकथित हिंदू उच्चजातीय रीतींप्रमाणेच साजरे केले जातात. रमजान ईद आली म्हणून शीर खुर्म्याकरता चारोळ्या नि सुका मेवा भिजत घातलाय, नाताळ आला म्हणून मनुके भिजत घातलेत, नारळी पौर्णिमेची जत्रा आहे म्हणून कुणी ट्रॅफीकमध्ये अडकलं, गावचा उरूस होता त्यात ढमकं झालं, आज आंबेडकर जयंती म्हणून जयंतीचा कार्यक्रम आहे, असे संवाद मी तरी ऐकलेले नाहीत. यातल्या पात्रांना कधी महागाई, महागडं शिक्षण, आरोग्याच्या सुविधांचा अभाव, बेरोजगारी असे जगण्यामरणाचे कोणतेच प्रश्न नसतात. इतका सगळा आपल्याच जाती-धर्म-वर्गातील एकजिनसी सुस्थितीचा सुखवस्तूपणा असूनही यातल्या एकाही पात्राच्या आयुष्यात सुख नाही. कुटुंबात आनंद नाही. आपण इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करावा अशी एकाही पात्राची घडण नाही. कुणीही गुण्यागोविंदाने नांदत नाही.



जगा आणि जगू द्या अशी आमची संस्कृती आहे म्हणे. या लोकांना मात्र हे नाकबूल आहे. आपल्याच धर्माचे सणवार तरी एकत्र आणतील म्हणावं, तर तीळगुळात मीठच काय घाल नि विषच काय कालव, अमक्या पूजेचा मान मोठ्या सुनेला की धाकट्या यावरून हाणामाऱ्याच काय कर, दांडिया (मराठी संस्कृती हं!) खेळताना स्टेजच काय तोड असे सणावाराच्या दिवशीही लोक एकमेकांच्या मुळावर उठलेले असतात. या मालिका पाहताना कुणीही हसत नाही. प्रेम, करुणा, सौहार्द असे काही भाव मनात निर्माण होण्याची सुतराम शक्यता नाही. आपलं मन फक्त द्वेष, क्रौर्य आणि जातायेता करायची निरनिराळी हिंसा यालाच सरावत जातं.

तात्पर्य, उद्या फक्त आपलाच धर्म, आपलीच जात, आपलीच भाषा असणारे लोक उरले, तरी सुखाची गॅरंटी नाही. गोष्टीतसुद्धा नाही. मग हा फालतूचा उपद्व्याप कशासाठी?

४०० रु. किलोवर पोचलेली लसूण, ३५०० रु. प्रतिक्विंटलने विकला जाणारा सोयाबीन, खतावरचा जीएसटी, न मिळालेली पीकविम्याची भरपाई, बंद होणाऱ्या शाळा, उद्या लांबवरच्या समूहशाळेत मुलींना पाठवताना वाटणारी धास्ती, शहरांची दुरवस्था, पडणारे पुतळे, गळणारी मेट्रो, महापालिका-नगरपालिका वगैरेंच्या निवडणुका न झाल्याने तुमचं काम करायला नसणारे नगरसेवक, पोर्तुगीजांनी इंग्रजांना दिली तशी एका उद्योगपतीला आंदण दिली जाणारी मुंबई या सगळ्या समस्या कुणाही दुसरी भाषा बोलणाऱ्या, दुसऱ्या धर्माच्या, जातीच्या माणसांमुळे निर्माण झाल्या नसून आपलीच भाषा बोलणाऱ्या, आपल्याच जातीधर्माच्या कुणीतरी खोके घेऊन ओके म्हटल्यामुळे निर्माण झाल्या आहेत. त्यांना आधी दणका द्या. उगा जातीधर्माच्या नावानं डोकं भडकावून घेऊ नका.

**(साभार)**

## लोकसंसद

### पोलिस हुतात्मा दिन

आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत-तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो. २४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६/११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला. दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन !

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२१ ऑक्टोबर**

**१९०४:-** ग्रंथकार, वृापत्रकार, वेदाभ्यासक शंकरषास्त्री रघुनाथषास्त्री गोखले यांचे निधन. ग्रंथलेखनाद्वारे देषसेवा करावी यासाठी 'वैद्यवर्ग वाग्भट चरित्र', 'संसर्गजन्य व्याधी अथवा गर्मीचे काही विकार', 'आर्यांच्या चौदा विद्या' ही पुस्तके तसेच 'संगीत रातोत्सव' हे पौरोणिक नाटक लिहिले. जनतेच्या हितासाठी निर्भिडपणे झगडणारा पत्रकार अशी त्यांची ख्याती. याषिवाय त्यांनी कोल्हापुरात स्वत:चा टाइपांचा कारखाना काढला. तसेच 'तवप्रकाश' व 'विद्याविलास' ही मासिके स्वत:च्या लेखनानिषी संपादित केली. **१९२०:-** वैदिक संस्कृतीचे अभ्यासक, लेखक, कीर्तनकार, धर्मभास्कर गं. ना. कोपरकर यांचा जन्म. चार वेद, सहा शास्त्रे, मनुस्मृती, याज्ञवल्क स्मृती आणि इतर विषयांवर त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची संख्या २००च्या आसपास जाते. **१९३३:-** निबंधकार गोविंद मल्लीनाथ ठेंगे यांचे निधन. मनोरंजन मधून त्यांनी लिहिलेली 'रोमन वीरपुरुषांच्या कथा' ही लेखमाला लिहिली. याषिवाय दादाभाई नौरोजी यांचे चरित्र व काही पुस्तकपरिचय त्यांनी केली. 'करमणूक, नवयुग मधून त्यांचे लेखन प्रसिध्द. ट्राईनच्या पुस्तकाच्या आधारे त्यांनी लिहिलेली 'सुखाचा शोध' ही लेखमाला मासिक मनोरंजातून प्रसिद्ध. **१९३८:-** नाटककार, निबंधकार, कवी केषव महादेव सोनाळकर यांचे निधन. 'कमलपराग' हा काव्यसंग्रह, 'प्रेमयोग उर्फ अंबाहरण' हे पौरोणिक नाटक अशी साहित्यसंपदा. याशिवाय 'आत्म्याचे बोल आणि वर्णाश्रमधर्मविषयक, वाराअमृततुषार' हे निबंधसंग्रह प्रसिद्ध. **१९३९:-** लेखक माधव वझे यांचा जन्म. रंगभुमीवरील महत्त्वाच्या नट नट्या, अभिनेते यांच्या मुलाखती समाविष्ठ असलेला 'रंगमुद्रा' हे पुस्तक त्यांच्या नावावर आहे. **१९४०:-** शिवचरित्रकार डॉ. बाळकृष्ण यांचे निधन. **१९४३:-** मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी झटणारे लेखक बाबासाहेब घोरे यांचे निधन. मराठी ग्रंथकारांचे उाम ग्रंथ प्रकाषित व्हावेत यासाठी त्यांनी 'इचलकरंजीकर ग्रंथमाला' नावाचा प्रकाशन-यत्न सुरु केला. 'ब्रिटनने हिंदुस्थानसाठी काय केले?', 'दक्षिणेतील शेतीची सांपाकि स्थिती' अशी पुस्तके त्यांनी लिहिली. त्याआधी, 'सम्राट व सम्राज्ञी यांच्या हिंदुस्थानातील प्रवासाचा ऐतिहासिक वृाांत' त्यांनी लिहिला होता. **१९५३:-** लेखक प्रा. डॉ. दाता सदाशिव गजघाटे यांचा जन्म. 'स्वामी विवेकानंद आणि मराठी वाङ्मय' या विषयात पीएच्.डी करणाऱ्या डॉ. गजघाटे यांनी 'बुद्धभीमाची धम्मक्रांती : स्वरुप व फलश्रुती' या ग्रंथासह 'ज्योतीकांता सावित्री' ही चरित्रात्मक कादंबरी लिहिली. **१९६०:-** साहित्यिक डॉ. रत्नाकर देवराव भेलकर यांचा जन्म. **१९७७:-** हिंदू धर्माच्या विविध पैलूंचे आणि योगशास्त्राचे अभ्यासक श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांचे निधन. मुक्ताबाईच्या ताटीच्या अभंगांचे त्यांनी केले, तसेच 'भीच्या वाटा' हे सुगम पुस्तकही लिहिले. रुद्रार्थदीपिका, परिव्राजकाचार्य आदी त्यांची पुस्तके अभ्यासूंसाठी उपयुक्त ठरली. त्यांच्या अशा पुस्तकांची यादी बरीच मोठी आहे.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### २१ ऑक्टोबर

१) श्रीम.विजया दत्ताराम म्हात्रे
पिंपळभाट, अलिबाग
२१-१०-१९५४
२) श्री. मोहनलाल लालजी नागडा
श्रीबाग-२, अलिबाग
२१-१०-१९५५
३) श्री. प्रकाश पांडुरंग प्रभू
अलिबाग,रायगड २१-१०-१९६१
४) श्री. हेमंत खंडेराव राऊत
अलिबाग, रायगड
२१-१०-१९६१
५)श्रीम. अरुणा प्रभाकर घर
चेंढरे, अलिबाग, २१-१०-१९४८

# मलईदार बदल्यांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी बदलीअस्त्र



**। पनवेल । वार्ताहर ।**
**नवी मुंबई पोलीसांना प्रामाणिक दलाचा दर्जा मिळावा यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्तांनी पदभार घेतल्यानंतर पहिल्यांदा मलईदार बदल्यांमधील भ्रष्टाचार थांबवून सगळ्याच पोलीस निरिक्षकांना सूखद आश्चर्याचा धक्का दिला. अधिकाऱ्यांना मलईदार पदांसाठी एकही रुपया मोजावा लागला नाही तर ते भ्रष्टाचार करणार नाहीत अशी धारणा आयुक्तांची होती. परंतू, मागील दोन आठवड्यात घडलेल्या भ्रष्टाचाराच्या विविध घटनांमुळे आयुक्तांनी पुन्हा एकदा बदलीचे अस्त्र उगारले आहे.**

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पोलीस दलातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सफाईची मोहीम हाती घेतली. मात्र, मोफत मलाईदार पद मिळवूनही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून भ्रष्टाचार थांबत नसल्याने आयुक्तांनी एका बैठकीत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमोर संताप व्यक्त केला. ५ ऑक्टोबरला कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांची तडकाफडकी पोलीस ठाण्यातून बदली करुन त्यांना पोलीस नियंत्रण कक्षात बसवण्यात आले. राजेंद्र कदम यांच्या जागी वाहतूक विभागात काम करणारे श्रीकांत धरणे यांची नेमणूक करण्यात आली. यापूर्वी ९ ऑक्टोबरला एनआरआय पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक सतीश कदम यांना मध्यरात्री ५० लाख रुपयांच्या मागणी केल्याप्रकरणी लाचेच्या प्रकरणात अटक करण्यात आली होती.

ईमारतीच्या दुर्घटना प्रकरणात गुंतवणूकदाराकडून पोलीस निरिक्षक सतीश कदम याने १४ लाख रुपये स्विकारल्यानंतर अजून त्याला १२ लाख रुपये पाहीजे होते. हीच रक्कम घेताना पोलीस निरिक्षक कदमला पोलीसांनी पकडले. कळंबोली पोलीसांचा लोखंड बाजार व परिसरात चालणाऱ्या काळ्या धंद्याची लेखी माहिती एका भंगार व्यवसायीकाने पोलीस आयुक्तांकडे दिली.

महिन्याला या पोलीस ठाण्याच्या प्रभारींना ४५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. यामध्ये विना कागदपत्रांची वाहने विल्हेवाट करणारी मोठी टोळी लोखंड पोलाद बाजारातील २२ गाळ्यांमध्ये सक्रीय आहे. या मोठ्या दुकानदारांकडून वाहनांचे सुटे भाग विकणारी ३५ दुकाने या परिसरात आहेत. यांना पोलीसांचा आशिर्वाद लागतो. जुन्या लोखंडाला नवीन कलई लावून बनावट विक्री करणारे लोखंड व पोलादाचा बेकायदा व्यापार कळंबोली लोखंड बाजारात चालतो. त्यालाही पोलीस आशिर्वाद देत असल्याचे बोलले जाते. पोलीस आयुक्त भारंबे यांच्या आदेशाने लोखंडी सळई व इतर साहीत्य वाहतूकदारांकडून खरेदी करणारा इम्तिहाज नावाच्या भंगार माफीयावर कारवाई केली होती. हा व्यवसाय पुन्हा सूरु झाल्याचे येथील व्यापारी सांगतात. या बाजारात दिडहजाराहून अधिक गोदाम आहेत. येथील चोरट्यांच्या टोळीचे व पोलीसांचे साटेलोटे असल्याची परिसरात जोरदार चर्चा आहे.

# नीतेश राणे यांनी आमचा पूर्व इतिहास जाणून घ्यावा

## परशुराम उपरकर यांचे आमदारांना प्रत्युत्तर

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**
आमदार नीतेश राणे यांनी पूर्व इतिहास समजून घेऊनच टीका करण्याचे धाडस करावे. मी राणेंना सोडून गेलो, असा उल्लेख करणाऱ्या नीतेश राणे यांनी त्यावेळचे राजकारण समजण्याएवढे आपले वय तरी होते का? हे प्रथम पहावे, अशी बोचरी टीका माजी आमदार परशुराम उपरकर यांनी केली. त्यामुळे विधानसभेच्या निवडणूकीत आता आरोप प्रत्यरोपांच्या फैरी झडणार असल्याचे चित्र आहे.



मी बाळासाहेब ठाकरे यांचा एकनिष्ठ शिवसैनिक म्हणून कायमच होतो. मात्र, आमदार राणे यांचे वडील नारायण राणे यांची शिवसेनेतून हाकालपट्टी केली होती. नंतरच्या कालावधीत मी शिवसेना सोडली असली तरीही मी बाळासाहेब ठाकरे यांचाच शिवसैनिक म्हणून कायमच राहिलो. राजकारणातील पूर्व इतिहास माहिती नसताना आमच्यावर टीका करण्याचे असे प्रयत्न केल्यास संपूर्ण पूर्व इतिहास समोर आणावा लागेल, असा इशारा उपकर यांनी दिला आहे.

मला कोणीही शिवसेनेतून हाकलले नाही. मी त्यावेळी स्वतःहून शिवसेना सोडली होती. मात्र, नारायण राणे मुख्यमंत्री होते, तेंव्हापासूनच मी एकाच पक्षात असलो तरीही अंतर राखून होतो. माझ्याबाबत बोलताना विचारपूर्वकच वक्तव्य करावे. अन्यथा पूर्व इतिहास आणि माझे प्रतिज्ञापत्र जनतेसमोर आणावे लागेल, असे इशारा उपरकर यांनी दिला.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८
**बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**आलिया रोहन महाडिक, वाढदिवस अलिबाग**

# दारूच्या नशेत पडून प्रौढ व्यक्ती जखमी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
शहरातील मारुती मंदिर सर्कल-मजगाव बसस्टॉपजवळ दारूच्या नशेत पडून जखमी झालेल्या प्रौढाला जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मंगेश यशवंत भारती (५२, रा. तोणदे, रत्नागिरी) असे जखमी प्रौढाचे नाव आहे. ही घटना शुक्रवारी (ता. १८) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास निदर्शनास आली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश दारूच्या नशेत मजगाव एसटी बसस्टॉप येथे जखमी अवस्थेत पडलेला होता. त्या वेळी तेथील रिक्षाचालक लियाकत युसूफ हपशी (रा. साखरतर, रत्नागिरी) याने त्या ठिकाणी पाहिले असता तो प्रौढ दारूच्या नशेत पडल्याने डोक्याला मार लागून जखमी अवस्थेत दिसून आला. रिक्षाचालक लियाकत यांनी माणुसकीच्या नात्याने तेथील आयटीआयच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने रिक्षाने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# अनिकेत लोहिया, शिवाजी माने यांना नवनिर्माण गौरव पुरस्कार

**सन्मानमूर्तीअनिकेत लोहिया हे प्रयोगशील व्यक्तीमत्व, शेतकरी, कष्टकरी असून ऊस कामगारांचे प्रश्न मांडताना शेती आणि पाण्याच्या जागृतीकडे अधिक लक्ष देतात. दुष्काळी भागात समाजोपयोगी प्रकल्प राबवून पाणीटंचाईवर मात केली. ज्यांची शेती आणि मातीशी नाळ जोडलेली आहे. अनेक अडचणी, गरिबीवर मात करत शिवाजी माने यांनी कामावरची निष्ठा, प्रामाणिकपणा उराशी बाळगून वाटचाल सुरू ठेवली. विज्ञानाचा ध्यास यातून नवनवीन प्रयोग करत मुलांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण केली. टाकावू वस्तूपासून वैज्ञानिक साहित्य बनवले आहे.**

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
नवनिर्माण शिक्षणसंस्थेचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष असून या निमित्ताने येत्या २५ व २६ ऑक्टोबरला विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. या निमित्त पहिल्या नवनिर्माण पुरस्कारांची घोषणा अध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांनी केली. दुष्काळी भागात जलसंवर्धनाचे भरीव कार्य करणारे मानवलोक संस्थेचे अनिकेत लोहिया (अंबेजोगाई) व वैज्ञानिक क्षेत्रात नावीन्यपूर्ण प्रयोग करणारे युवा कार्यकर्ते शिवाजी माने (जढाळा, लातूर) हे मानकरी ठरले आहेत. २५ हजार रुपये सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या २६ ऑक्टोबरला सायंकाळी ४.३० वा. हा सोहळा एमआयडीसीतील नवनिर्माण शिक्षणसंस्थेच्या एस. एम. जोशी विद्यानिकेतनमध्ये होईल. या वेळी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे उद्घाटन (कै.) मोहन खातू क्रीडा संकुल अनावरण या कार्यक्रमात या

### शनिवारी होणार वितरण

पुरस्कारांचे वितरण केले जाणार आहे. २६ ऑक्टोबरला पद्मश्री डॉ. गणेश देवी, पद्मश्री डॉ. झहीर काझी, माजी कुलगुरू भालचंद्र मुणगेकर, राष्ट्र सेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन वैद्य, डॉ. प्रदीप ढवळ यांच्या उपस्थितीत सोहळा होईल. हेगशेट्ये यांनी सांगितले, वंचित बहुजन वर्गातील विद्यार्थ्यांना, युवकांसाठी प्रेरणादायी आणि प्रज्वलित करणारे अंकूर मनात जागवू शकतील, अशा विविध क्षेत्रातील प्रतिभावंतांना गौरवण्यात येते. महाराष्ट्रात विविध क्षेत्रात विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांच्या कार्याची ओळख रत्नागिरीकरांना होण्याकरिता संस्थेने विज्ञान, शिक्षण, सामाजिक, साहित्य या चार क्षेत्रांपैकी दरवर्षी दोन क्षेत्रांतील विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना नवनिर्माण गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# २५१ शेतकऱ्यांच्या भातशेतीचे मोठे नुकसान

**संगमेश्वर :** तालुक्यात पावसामुळे भातशेतीला मोठा फटका बसला असून, तीन महिन्यांमध्ये २५१ शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची नोंद कृषी विभागाकडे करण्यात आली आहे. यावर्षी पावसाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला असून, पिकलेली भातशेती आडवी झाली आहे. दररोज पडणाऱ्या पावसामुळे कापणी करायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. जुलैमध्ये १७९, तर सप्टेंबरमध्ये ७२ शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याची नोंद कृषी विभागाकडे करण्यात आली आहे. भातकापणी करताना भात भिजले असल्यास शेतकऱ्यांनी त्वरित तालुका कृषी विभागाकडे संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# खारेपाटणमध्ये रक्तदान शिबिराला प्रतिसाद

## ४३ जणांनी घेतला सहभाग

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
खारेपाटण पंचक्रोशी सकल मराठा समाज व खारेपाटण महाविद्यालय एनएसएस विभागाच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरामध्ये ४३ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन खारेपाटण पंचक्रोशी सकल मराठा समाजाचे अध्यक्ष रमाकांत राऊत यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

यावेळी खारेपाटण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. डी. कांबळे, एनएसएस विभाग प्रमुख प्रा. वसीम सय्यद, ओरोस जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीचे डॉ. संकेत रोटे, खारेपाटण पोलिस दूरक्षेत्राचे पोलिस अंमलदार माने, सामाजिक कार्यकर्ते संतोष पाटणकर, मंगेश गुरव, महेश कोळसुलकर, संकेत शेट्ये, सुरेंद्र कोरगावकर आदी उपस्थित होते. खारेपाटण पंचक्रोशी सकल मराठा समाजातर्फे खारेपाटण सोसायटी सचिव अतुल कर्ले, खारेपाटण पोलिस दूरक्षेत्राचे नव्याने रुजू झालेले पोलिस अंमलदार माने यांचा सकल मराठा समाजातर्फे सत्कार करण्यात आला.

या शिबिराला खारेपाटण पंचक्रोशी सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते चंद्रमोहन शिंदे, अरविंद कर्ले, श्रीकांत भालेकर, सुबोध देसाई, बळीराम भालेकर, धनराज शेलार, चंद्रकांत मण्यार, सुधाकर कर्ले, विनोद शेलार, महेश राऊत, अशोक पाटील, अरुण कर्ले, संदीप सावंत, बाळा राऊत, सुनील कर्ले, दिगंबर भालेकर, जगदीश सावंत, नाना शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हा रुग्णालय रक्त पतपेढीचे डॉ. संकेत रोटे यांच्यासह टेक्निशियन मयुरी शिंदे, नेहा परब, कांचन परब, नंदकुमार आडकर, नितीन बावकर, मिलिंद कांबळे आदींचे सहकार्य लाभले. खारेपाटण पंचक्रोशीतील ग्रामस्थांसह महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाचे विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले. खारेपाटण पंचक्रोशी सकल मराठा समाज संघटनेचे सचिव ऋषिकेश जाधव यांनी आभार मानले.

# बेकायदा गोवा बनावटीची १८ लाखांची दारु पकडली

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
बेकायदा गोवा बनावटीची दारू वाहतूक केल्याप्रकरणी धाराशिव येथील एकाला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १८ लाखांच्या दारूसह ८ लाखांचा टेम्पो असा एकूण २६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अमजद शेरखान पठाण (वय २३, रा. येरमाळा ता. कळंब, जि. धाराशिव) असे त्याचे नाव आहे. ही कारवाई मुंबई-गोवा महामार्गावर कसाल येथे राज्य उत्पादक शुल्कच्या भरारी पथकाकडून करण्यात आली. याबाबत अधिक माहिती अशी की, राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मुंबई-गोवा महामार्गावर कसाल येथे वाहनांची तपासणी करत असताना मालवाहू टेम्पोमध्ये गोवा बनावटीची बेकायदा दारू आढळून आली.

याप्रकरणी अमजद शेरखान पठाण याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून गोवा बनावटीच्या दारूच्या विदेशी मद्याचे विविध ब्रँडचे १८ लाख रुपये किमतीचे ३०० खोके जप्त केले, तर ८ लाखांच्या टेम्पोसह एकूण २६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई अधीक्षक मनोज शेवरे, निरीक्षक शरद जाधव, दुय्यम निरीक्षक विशाल सरवटे, सहायक दुय्यम निरीक्षक गोपाळ राणे, जगन चव्हाण आदींच्या पथकाकडून केली. अधिक तपास दुय्यम निरीक्षक विशाल सरवटे करीत आहेत.

निवडणूकीची तोंडावर प्रशासन ॲक्शनमोडमध्ये आल्याचे दिसते.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मनुष्यबळाची पहिली सरमिसळ संपन्न

**। रायगड । प्रतिनिधी ।**
जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील प्रथमस्तरीय तपासणी झालेल्या ३ हजार ६८१ मतदान यंत्रांची पहिली जिल्हास्तरीय सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघमारे, आचारसंहिता पथक प्रमुख उपजिल्हाधिकारी संदीपान सानप, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी निलेश लांडगे आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ६ हजार २०० बॅलेट युनिट, ३ हजार ४०५ कंट्रोल युनिट आणि ३ हजार ६८१ व्हीव्हीपॅट यंत्रांची पहिली सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली.

तत्पूर्वी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना जिल्हाधिकारी जावळे यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली. राजकीय पक्षांच्या उपस्थितीत तपासणी पूर्ण करण्यात आली असून ते सुस्थितीत आहेत.

# चिपळूण नगरपालिकेचा कारभार मंदावला

## अधिकाऱ्यांसह अभियंत्यांची पदे रिक्त

**काही नियुक्त्या झाल्या, मात्र प्रशासकीय कामकाजाला गती मिळण्याच्या दृष्टीने दिलासा देणारी बाब म्हणजे बांधकाम विभागात स्थापत्य अभियंत्यांची नियुक्ती झाली असून, कोयना येथील दीपक निंबाळकर, विद्युत अभियंता म्हणून पेण येथील संगीता तांबोळी, संगणक विभागात संगणक अभियंता म्हणून लांजा येथील निवेदिता आंबेकर, कर व प्रशासकीय सेवा विभागात कराड येथील सागर शेडगे आदी नियुक्त्या झाल्या आहेत. मात्र, अद्यापही पाणीपुरवठा, नगर अभियंता व सहायक अशी पदे भरणे गरजेचे आहे.**

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**
नगरपालिका इमारत, ग्रॅव्हिटी पाणीयोजना व अन्य महत्त्वाच्या प्रकल्पांना चालना देण्याची गरज असताना अधिकाऱ्यांअभावी नगरपालिकेचा कारभार काहीसा मंदावला आहे. बांधकाम तसेच पाणीपुरवठा अभियंता ही दोन्ही महत्त्वाची पदे रिक्त असल्याने शहरातील मोठ्या प्रकल्पांना खीळ बसली आहे. केडरअंतर्गत असलेली ही पदे तातडीने भरण्याची मागणी होत आहे. सध्या चिपळूण नगरपालिकेत



विविध विभागांत अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या केडरअंतर्गत बदलीने नियुक्त्या झाल्या आहेत. यामध्ये चिपळूण नगरपालिकेतील बांधकाम अभियंता प्रणोल खताळ व पाणीपुरवठा अभियंता नागेश पेठे यांची बदली झाली; परंतु अद्याप नव्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या झालेल्या नसल्याचे दिसते. या व्यतिरिक्त विद्युत अभियंता, संगणक अभियंता व कर प्रशासकीय सेवा आदी प्रमुख विभागांतून अधिकारी नव्याने कार्यरत झाले; परंतु बांधकाम व पाणीपुरवठा या महत्त्वाच्या विभागाला अद्याप अधिकारी मिळालेला नाही. कोळकेवाडी धरणातून शहरात ग्रॅव्हिटीने पाणीपुरवठा करणारी पाणीयोजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेसाठी नुकतीच निविदा प्रक्रिया पूर्ण करून नाशिक येथील ठेकेदार कंपनीला कामाचा आदेश देण्याची प्रक्रिया सुरू आहे. नगरपालिका इमारत धोकादायक झाली आहे. या इमारतीच्या आवारात तसा फलकदेखील लावण्यात आला आहे. आगामी नगरपालिका निवडणुका लक्षात घेता त्या आधी या इमारतीचे बांधकाम पूर्ण होण्याची आवश्यकता होती; मात्र बांधकाम अभियंताच नसल्याने हेही काम रखडले आहे.

## दिवाळी हंगामात धावणार विशेष रेल्वे गाड्या

# कोकणवासियांसाठी गुड न्यूज




**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**
रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी अतिशय महत्त्वाची बातमी समोर आली आहे. दिवाळीच्या सुट्टीत गावी कोकणात फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी अतिशय महत्त्वाची आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा देखील दिवाळी विशेष गाड्यांची यादी कोकण रेल्वेने जाहीर केली आहे.

दिवाळीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. त्यामुळे रेल्वे गाड्यांची बुकिंग आतापासून फुल होण्यास सुरुवात झाली आहे. दिवाळीच्या काळात रेल्वेत होणारी गर्दी कमी करण्याच्या उद्देशाने नियमित गाड्याव्यतिरिक्त काही विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. या विशेष गाड्या २५ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबर या काळात चालविण्यात येणार असून त्यामध्ये प्रामुख्याने ०१४६३/०१४६४ एलटीटी कोचुवेली विशेष ट्रेन ( एकूण आठ फेऱ्या) : ०१४६३ विशेष गाडी दिनांक २४ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबरपर्यंत दर गुरुवारी लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई स्थानकावरून संध्याकाळी ४ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री १० वाजून ४५ मिनिटांला कोचीवेली या स्थानकात पोहोचेल. ०१४६४ विशेष गाडी दिनांक २५ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबरपर्यंत दर शनिवारी कोचुवेली या स्थानकावरून संध्याकाळी ४ वाजून २० मिनिटांनी सुटेल आणि दुसऱ्या दिवशी रात्री ९ वाजून ५० मिनिटांला लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे पोहोचेल. ०११७५/०११७६ पुणे सावंतवाडी पुणे विशेष ट्रेन (एकूण आठ फेऱ्या)०११७५ : विशेष गाडी दिनांक २२ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबरपर्यंत दर मंगळवारी पुणे या स्थानावरून सकाळी ०९ वाजून ३५ मिनिटांला सुटेल आणि त्याच दिवशी रात्री १० वाजून ३० मिनिटांला सावंतवाडी येथे पोहोचेल. ०११७६ विशेष गाडी दिनांक २२ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर पर्यंत दर बुधवारी सावंतवाडी या स्थानकावरून रात्री ११ वाजून २५ मिनिटांला सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजून १५ मिनिटांला पुणे येथे पोहोचेल

०११७७/०११७८ पनवेल सावंतवाडी पनवेल ट्रेन( एकूण आठ फेऱ्या)०११७७ : विशेष गाडी दिनांक २२ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर पर्यंत दर बुधवारी पनवेल स्थानकावरून सकाळी ०९ वाजून ४० मिनिटांला सुटेल आणि त्याच दिवशी रात्री ११ वाजून ०५ मिनिटांला सावंतवाडी येथे पोहोचेल. ०११७८ विशेष गाडी दिनांक २३ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर पर्यंत दर गुरुवारी सावंतवाडी स्थानकावरून रात्री ११ वाजून २५ मिनिटांला सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०८ वाजून ४० मिनिटांला पनवेल येथे पोहोचेल.

# भरारी पथके ॲक्शन मोडमध्ये

## तपासणी नाक्यांना दिल्या भेटी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
आदर्श आचारसंहिता सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील भरारी पथकेॲक्शन मोडवर आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार, अप्पर जिल्हाधिकारी शंकर बर्गे यांनी हातखंबा येथील तपासणी नाक्याला भेट देऊन वाहनांची तपासणी केली. जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी सर्व नोडल अधिकारी, विभागप्रमुखांची बैठक घेऊन भरारी पथकांना सतर्क राहण्याबाबत सूचना दिल्या होत्या. गोवा बनावटीची दारू, नियमबाह्य रोकड याची वाहतूक होऊ नये याबाबत वाहनांची कसून तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार आदर्श आचारसंहिता पथकाचे नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुजार, सहाय्यक नोडल शंकर बर्गे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल देसाई आणि पोलिस अधिकारी, कर्मचारी यांनी हातखंबा येथील तपासणी नाक्यावर भेट दिली. येणाऱ्या वाहनांची तपासणी केली.

**निवडक**

### कामोठ्यात डिझेलची चोरी

**नवीन पनवेल :** शवाजी जाधव यांनी टँकर (एम एच-१३-सीओ-६१८९) इस्लामपूर एमआयडीसी राजाराम पाटील दूध सहकारी संघटना येथून दूध भरले व तेथील डिझेल पंपावर ३०० लिटर डिझेल भरले. जवाहर इंडस्ट्री येथे दूध खाली करण्यासाठी ते निघाले. पहाटे तीन वाजता कामोठे येथील सुविधा कोल्ड स्टोरेज जवाहर इंडस्ट्री येथे पोहोचले. पहाट झाल्यामुळे ते झोपी गेले. त्यांना सकाळी जाग आली असता डिझेलच्या टाकीचे लॉक तुटलेले दिसले. अंदाजे २०० लिटर डिझेल चोरट्यांनी चोरून नेले.

### घरफोडीत दागिन्यांची चोरी

**नवीन पनवेल :** काळुंद्रे येथे चोरांनी केलेल्या घरफोडीत चार लाखांचे दागिने व रोख रक्कम लंपास केले आहेत. पनवेल शहर पोलीस या चोरांचा शोध घेत आहेत. सनी चिखलेकर हे काळुंद्रे येथे राहत असून चोराने दरवाजाचे कडीकोयंड्याच्या सहाय्याने लॉक तोडले आणि घरात प्रवेश केला. बेडरूम मधील लोखंडी कपाटाचा दरवाजा वाकवला आणि लॉकरमधील सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा ४ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

### लाथा बुक्क्यांनी मारहाण

**नवीन पनवेल :** दिगंबर केणी हे १८ ऑक्टोबर रोजी ते तळोजा येथील चष्म्याचे दुकानात जाऊन कर्मचाऱ्यांना तुटलेला चष्मा दाखवून चष्म्याचा विमा काढला असल्याचे सांगितले. यावेळी कर्मचाऱ्यांनी चष्मा विकत घेतेवेळी विमा काढला नसल्याचे सांगितले. यानंतर एका कर्मचाऱ्याने धक्का देऊन त्यांना शोरूमच्या बाहेर काढले. यावेळी धक्का का दिला असे विचारले असता नाकावर व तोंडावर बुक्क्यांनी मारहाण केली. यात ते जखमी झाले. शाहरुख शेख याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### नदीत सापडला मृतदेह

**पनवेल :** पेठगावात राहणारी काजल पासवान (१७) दुपारी आपल्या घरातून बेपत्ता झालेली होती. या मुलीचा मृतदेह गाढी नदीत सापडला. काजल दहावीत नापास झाल्याने २०२२ पासून घरामध्येच होती. दरम्यानच्या काळात काजलच्या डोक्यात आणि पोटामध्ये गाठ असल्याचे तपासणीत आढळून आले होते. यामुळे तिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल देखील करण्यात आले होते. या सर्व प्रकारामुळे काजल नैराश्येत आली होती. यामुळे रात्रीच्या वेळेत घरातून निघून तने गाढी नदीच्या पात्रात उडी टाकून आत्महत्या केली.

### मुलीसह आई बेपत्ता

**पनवेल :** पालेबुद्रुक येथे राहणाऱ्या सविता मंगेश मासवे (२५) व त्यांची एक वर्षाची मुलगी रेवांशी या दोघी हरविल्या असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. सविता यांची उंची ५ फुट, रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे लांब, नाक सरळ, बांधा मध्यम, डोळे काळे असून अंगात पंजाबी ड्रेस, पायात चप्पल, गळ्यात सोन्यासारखे मंगळसूत्र आहे. त्याचप्रमाणे एक वर्षाची मुलगी सोबत आहे. या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

# बल्लाळेश्वरच्या दर्शनाला भाविकांची मांदियाळी

## संकष्टी चतुर्थीला बाप्पाच्या चरणी गाऱ्हाणे



**। पाली/बेणसे/गोमाशी। वार्ताहर ।**

सध्या महाराष्ट्र आस्मानी व नैसर्गिक आपत्ती तसेच परतीच्या पावसाने ग्रासला गेला आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. यातच महागाईने देखील सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. सुशिक्षित तरुण रोजगारासाठी वणवण भटकंती करीत आहे. अशा अनेक समस्या व संकटांनी हैरान झालेल्या भाविकांनी रविवारी (दि.२०) संकष्टी चतुर्थीला महाराष्ट्रातील प्रख्यात तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील बल्लाळेश्वर चरणी साकडे घालण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

संकष्टी चतुर्थीच्या दिवशी अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीतील श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे पासूनच दर्शनासाठी लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. रविवारी सुट्टी असल्याने बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून हजारो पर्यटक व भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावला आहे.

यावेळी दर्शनासाठी आलेल्या भाविकांमुळे मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप आले होते. यामुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लोजिंग बोर्डिंगवाले, पापड, लोणचे, मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, सरबतवाले, छोटेमोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. तसेच, भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्यावतीन चोख व्यवस्था करण्यात आली होती.

> संकष्टी चतुर्थीला रविवारी सुट्टी असल्याने भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येत आहेत. हे भाविक दुकानातून चांगली खरेदी करत आहेत. यामुळे धंदा चांगला होत आहे.
>
> – नरेश बैकर, व्यावसायिक, बल्लाळेश्वर मंदिर

> बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्यावतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद (भोजन) उपलब्ध आहे. सुरक्षारक्षक तैनात आहेत. भाविकांना राहण्यासाठी दोन सुसज्ञ भक्त निवास आहेत. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्कींगसाठी देवस्थानची दोन मोफत पार्किंग आहे. तसेच, सुसज्ञ स्वच्छता गृह देखिल उभारण्यात आले आहेत. यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही.
>
> – जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

**महिलांना रोजगार**

बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फुले घेऊन अनेक आदिवासी विक्रेत्या महिला विक्री करत आहेत. देवळात येणारे भाविक आवर्जून येथून खरेदी करत आहेत. यामुळे या विक्रेत्यांचा धंदा सुद्धा चांगला होत असून त्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

**वाहतुक कोंडी**

बल्लाळेश्वरच्या दर्शनाला अनेक भाविक स्वतःची वाहने घेऊन तर, काही लक्झरी किंवा खासगी बसेसने आले होते. शिवाय इतर पर्यटक देखील पालीतून इतरत्र जात होते. परिणामी पर्यटक व भाविकांच्या गाड्यांमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी झाली होती.



## चिरनेर नगरी भक्तगणांनी दुमदुमली

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर नगरीत संकष्टी चतुर्थीनिमित्त रविवारी (दि.२०) भाविकांनी महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच रांगा लावल्या होत्या. काही भाविकांनी पायी वारी करीत मंदिर गाठत श्रींचे दर्शन घेतले. यावेळी रायगड, नवी मुंबईसह हजारोंच्या संख्येने भाविक दाखल झाले होते. विशेषतः यावेळी छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय देखील तेजीत होता.

यावेळी महागणती मंदिर परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. यामुळे शोभिवंत वस्तूंची दुकाने, हॉटेल, नारळ, हार, फुले, मातीची भांडी, पापड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले सुखावले होते. तसेच, महागणपती मंदिर परिसरात अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या फळे, कंदमुळे व रानमेवा विक्री करण्यासाठी आल्या होत्या. बाप्पाचा प्रसाद म्हणून मंदिरात येणारे भाविक येथून आवर्जून हा ग्रामीण रानमेवा खरेदी करत होते. भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थानातर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.

## सिद्धिविनायक मंदिरात भाविकांची गर्दी



**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

अश्विन कृष्ण चतुर्थी अर्थात चातुर्मासातील शेवटच्या संकष्टी चतुर्थीला मुरुड तालुक्यातील नांदगावच्या श्री सिद्धिविनायक मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. देवस्थानच्या सेवा मंडळाचे पुजारी महेश गोविंद जोशी व विनायक पुरुषोत्तम जोशी यांनी पहाटे श्री सिद्धिविनायकाची शोडषोपचारे पूजा केली. यानंतर मुरुड तालुक्यातील तसेच मंदीराच्या पंचक्रोशीतील भक्तांनी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. यावेळी संकष्टी निमित्ताने मंदिरासमोरील पटांगणात फुले, हार, पेढे, नारळ, दुर्वा व अन्य साहित्यांची दुकाने विक्रेत्यांनी लावली होती.ऑक्टोबर हिटमुळे दुपारी तुरळक गर्दी होती. मात्र, सायंकाळी यात वाढ झाली होती. रात्री स्थानिक भजनी बुवांनी मंदिरात सुस्वर भजने सादर केली.



● नविन पनवेल सेक्टर-१४ येथिल उद्यानांची दयनीय अवस्था झाली आहे. सिडकोने उभारलेली ही उद्याने पनवेल महापालिकेकडे हस्तांतरण करण्यात आली आहेत. या उद्यानांची डागडुजी करण्यासाठी सिडको आणि महापालिका कोणीही जबाबदारी घेत नाही. येथील नागरिक दुहेरी कर भरत असून फक्त ठेके मिळवण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे. (छायाचित्र- राजेश डांगळे)




## विहीरीत पडलेल्या भेकराला जीवनदान

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

चौल परीसरात शनिवारी (दि.१९) एका वाडीतील विहीरीत एक भेकर प्रजातीचे वन्यजीव पडले असल्याचे निर्सप्रेमी राकेश काठे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ विहीरीत उतरून त्या भेकराला बाहेर काढले व त्वरित अलिबाग वनविभागाला कळविले. या घटनेची तातडीने दखल घेत वनपरिक्षेत्र अधिकारी नरेंद्र पाटिल, नागाव वनपरिमंडळाचे वनअधिकारी वनपाल विजय पाटील, नियतक्षेत्र अधिकारी एम.डी तायडे, उदय हटवार, दत्ता कोळेकर, शुभम महाले, निलेश पवार हे घटनास्थळी दाखल झाले. या भेकराची पहाणी केली असता ते एक किशोर वयीन नर प्रजातीचे भेकर असुन त्याच्या मागील पायाला दुखापत झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या भेकराला पुढील उपचारासाठी पुणे येथील उपचार केंद्रात पाठविले असून ग्रामस्थ राकेश काठे, अथर्व वसईकर, सार्थक उळे, अथर्व नाईक, विश्वनाथ ठाकूर, अरविंद बुरांडे, ओंकार उळे, मारूती भगत, जयेश वसईकर यांचे उपस्थित वनअधिकारी यांनी आभार मानले.

## परतीच्या पावसामुळे पर्यटनाला बहर



**। पाली । वार्ताहर ।**

मागील काही दिवसांपूर्वी काही प्रमाणात पावसाने दडी मारल्याने पर्यटकांचा हिरमोड झाला होता. मात्र, मागच्या आठवड्याभरात परतीच्या पावसाने पुन्हा एकदा दमदार हजेरी लावल्याने ऑक्टोबर महिन्यात देखील पावसाळी पर्यटन बहरले आहे. धबधबे पुन्हा कोसळू लागले आहेत. शिवाय ट्रेकिंग देखील जोरात आहे. परिणामी स्थानिक व्यावसायिकांना उभारी मिळाली आहे.

परतीच्या पावसामुळे जिल्ह्यातील विविध ठिकाणचे पांढरे शुभ्र धबधबे व धरणांचे पाणी ओसंडून वाहू लागले आहे. कुंडलिका, अंबा, उल्हास, सावित्री, पाताळगंगा व गाढी आदी नद्या देखील दुथडी भरून वाहत आहेत. डोंगरावरून खळखळत वाहत येणाऱ्या जलधारांना जोर आला आहे. आणि हे सर्व पर्यटकांना आकर्षित करत आहेत. शिवाय सुधागड, सरसगड, रायगड, मनगड, अवचितगड, मृगगड आदी गडकिल्ले व डोंगरांवर ट्रेकिंग देखील होत आहे. शनिवार दि. १९ व रविवार दि. २० ऑक्टोबर रोजी पर्यटक व ट्रेकरने या ठिकाणी गर्दी केली होती. पाऊस असाच राहिल्यास पुढील काही दिवसांत अजूनही ट्रेकर व पर्यटकांचा ओघ वाढण्याची शक्यता आहे.

## आश्रमशाळेत फुलवली परसबाग

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शासकीय आश्रमशाळते कॉलेज ऑफ होम सायन्स आणि निर्मला निकेतन यांच्या माध्यमातून परसबाग फुलवण्याचा उपक्रम सुरू आहे. भालिवडी येथील शासकीय आश्रमशाळेत परसबाग फुलवल्यामुळे या आश्रम शाळेतील विद्यार्थीना ताजा भाजीपाला मिळू शकणार आहे.

कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या मार्फत किचन गार्डनच्या माध्यमातून अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण अंतर्गत शासकीय आश्रमशाळा भालीवडी येथील परिसरात परसबाग तयार करण्यात आली आहे. या परसबागेत शिराली, घोसाळी, डांगर भोपळा, दुधी या वेलवर्गीय भाज्या व भेंडी, हिरवा माठ, मुळा आदी भाज्यांची लागवड करण्यात आली आहे. या परसबाग मध्ये तयार झालेली भाजी उपलब्धतेनुसार आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना जेवणामध्ये दिली जाते.



## पंचनामे करून भरपाईची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यामध्ये सध्या अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. या परतीच्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्याची उभी पिके आडवी झाली आहेत. यामुळे शेतकऱ्याच्या तोंडाशी आलेला घास नैसर्गिक आपत्तीमुळे गेल्याने शेतकरी बांधव हवालदिल झाला आहे. आता पुढे काय करायचे, कसे जगायचे, असा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहिला आहे. यामुळे कर्जत तालुका आदिवासी समाज संघटनेने कर्जत तहसिलदार यांची भेट घेऊन पंचनामा करून भाताच्या पिकाबद्दल नुकसान भरपाई करण्याची मागणी केली. कर्जत तहसीलदार यांच्याकडून निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत यांच्याकडे निवेदन दिले.

## मतदान वाढीसाठी पथनाट्याद्वारे जनजागृती

**। खरोशी । वार्ताहर ।**

विधानसभेची निवडणूक जाहीर करण्यात आली असल्याने या निवडणूकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी विविध स्तरावरून वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. असाच एक मतदान जनजागृतीचा उपक्रम वडवळी येथील राजिप शाळेने सादर केला आहे. या शाळेच्या विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृतीसाठी शनिवारी (दि.१९) सकाळी गावामध्ये मतदान जनजागृती प्रचार फेरी काढून विविध प्रकारच्या घोषवाक्यांनी गावात प्रचार केला. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्याला ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला. यासाठी मुख्याध्यापक सुधाकर थळे, शिक्षिका करूणा बोंबे, हर्षा काळे, वृषाली देशमुख, राजाराम जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## जयेंद्र पाशिलकर यांनी फुलवली फुल शेती

# बांधकाम व्यावसायिकाचा तरूणांपुढे आदर्श

**। तळा । वार्ताहर ।**

**तळा तालुक्यातील गिरणे हे गाव व्यवसाय व शेतीसाठी प्रसिद्ध असणारे गाव आहे. या गावातील शेतकरी पारंपारिक व आधुनिक पद्धतींचा अवलंब करून शेतीत विविध प्रयोग करत आहेत. यातच गावचे अध्यक्ष व बांधकाम उद्योजक जयेंद्र पाशिलकर यांनी मोठ्या मेहनतीने त्यांच्या दहा गुंठे शेतात फुलशेती फुलवली असून तरूणांपुढे एक वेगळाच आदर्श ठेवला आहे.**

तळा तालुक्यातील गिरणे हे गाव चवळी, वाल, मटकी अशा कडधान्यांची शेती व्यवसायासाठी प्रसिद्ध असणारे गाव आहे. गावातील शेतकरी पारंपारिक व आधुनिक पद्धतींचा अवलंब करून शेतात विविध प्रयोग करीत असतात. यातील उद्योजक जयेंद्र पाशिलकर यांनी यांच्या १० गुंठे शेतीत फुलशेती फुलवली आहे. या शेतीमधे २ हजार झेंडूच्या विविध फुलांची रोपे लावली आहेत. तसेच, जी पिके येथे होत नाहीत अशी अनेक पिके घेण्याचा निश्चय करून गेल्या वर्षी प्रायोगिकत्वावरती थोड्या भागात त्यांनी केली होती. यातून त्यांना





चांगले उत्पन्न देखील मिळाले होते. यावर्षी दहा गुंठ्यांत २०० मिरचीची रोपे लावली आहेत. याचबरोबर मका, कल्याणी आलू, माठ, कोथिंबीर, वांगी, पालक, भेंडी अशा रोपांची लागवड केली असून आता ही रोपे चांगली जोमाने येऊन चांगले उत्पन्न देत आहेत. तसेच, या रोपांना जास्त प्रमाणात शेणखत व योग्य प्रमाणत रासायनिक खताचा वापर करण्यात आला आहे. यामुळ दोन दिवसा आड फुले मिळण्यास सुरू झाले आहे. प्रत्येक तरूण शेतकऱ्यांनी जयेंद्र पाशिलकर यांचा आदर्श घेत अत्याधुनिक पद्धतीने शेती केल्यास चांगले उत्पन्न घेता येईल.

> जिद्द, मेहनत व कष्ट केले की त्याचे फळ मिळते. आपली शेतीही उत्पन्न देणारी आहे. झेंडूच्या एका रोपामागे १०० रूपये उत्पन्न मिळेल. तसेच, वांगी व मिरचीच्याही एका रोपापासून १०० रूपये उत्पन्न निश्चित मिळेल. तसेच, आपल्या भागात अत्याधुनिक पद्धतीचा अवलंब केल्यास सर्व प्रकारची पिके घेऊन उत्पन्न मिळवता येऊ शकेल.
>
> – जयेंद्र पाशीलकर, शेतकरी, गिरणे

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● नागाव येथे कामासाठी बाई ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५

● फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएनल संपर्क :- ८२७५११९८८३.

● Rasik Hardware Alibag. 9422690854. Male Staff Requirement Experience Of Atleast 1 Year.Salary 12000.

● वरदान फ्युअल स्टेशन येथे कामासाठी मुलगी पाहिजे शिक्षण १५ वी पास व कॉम्प्युटर कोर्स (Tally, Excel) व कमीत कमी एक वर्षाचा एक्सपिरिअन्स हवा भेटायला येण्याची वेळ 10 AM To 4PM संपर्क : ७४४७४०४४११, ७४४७४०४४३८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# दिवेआगर पर्यटनाच्या वैभवात भर

## श्रीसिद्धनाथ व श्रीकेदारनाथ या दोन मंदिरांसाठी एक कोटी बत्तीस लाखाचा निधी

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर हे जगप्रसिद्ध धार्मिक व पर्यटन स्थळ असून, याच ठिकाणी श्रीसिद्धनाथ भैरव व श्रीकेदारनाथ भैरव ही दोन मंदिर आहेत. या मंदिरांच्या उभारणीसाठी एक वर्षापूर्वी तब्बल एक कोटी बत्तीस लाखाचा निधी आला होता. मात्र, अंतर्गत वादामुळे मंदिर बांधकामाला सुरुवात झाली नव्हती. वेळोवेळी जनमानसातून मंदीर कधी होणार अशी विचारणा केली जात होती. शेवटी हा वाद मिटला आणि मंदिराच्या बांधकामाला अखेर सुरुवात झाली आहे.



दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मंदिर, रूपनारायण, पंचमुखी महादेव, उत्तरेश्वर पंचमुखी यांच्याप्रमाणे श्रीसिद्धनाथ व श्रीकेदारनाथ या मंदिरांना देखील वैभवसंपन्न असा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. या मंदिराच्या नूतनीकरणाने कोकणातील विकासाला चालना मिळण्यासाठी गतवर्षी सप्टेंबर महिन्यात कामाचे भूमिपूजन करण्यात आले. मात्र, या कामात चालढकलपणा होत असल्याने, अधिकाऱ्यांकडून देखील बांधकामाचा श्रीगणेशा झालाच नाही.

- **भैरवनाथ मंदिरामुळे पर्यटनाला उभारी**
- **श्रीवर्धनकरांची प्रतीक्षा संपली**

येथील भैरवनाथाची यात्रा गावातील प्रमुख उत्सव आहे. त्यामुळे विशेषतः दोन दिवस भरणाऱ्या वैशिष्ट्य पूर्ण यात्रेला गावकऱ्यांची व राज्यभरातील भाविकांची अलोट गर्दी असते. मागील यात्रोत्सवाला मंदिरांच्या नूतनीकरणाला सुरुवात होऊन कामाला गती मिळावी आणि येणाऱ्या यात्रे पर्यंत काम पूर्ण व्हावे. अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत होती. मात्र, अनेक मतभेद असल्याने मंदिराचे बांधकाम राहूनच गेले. येथे भैरवनाथाच्या मंदिरांची उत्सुकता पंचक्रोशीतील सर्वांनाच लागली असताना, आता मंदिरांच्या बांधकामाला सुरुवात झाल्याने भक्तगणांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

> भैरवनाथ मंदिराच्या उभारणीला सुरुवात झाली आहे. ग्रामस्थांनी या कामात पुढाकार घेतला असून यंदाच्या यात्रोत्सवापूर्वी मंदिर बांधकाम पूर्ण होईल. यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.
>
> – सिद्धेश कोजबे. सरपंच दिवेआगर.

# डॉ.जयपाल पाटील यांचा सन्मान

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

नागरिकांच्या सुरक्षा साठीचे धडे जगभरात ५०० हून अधिक व्याख्याने देणारे चेंढरे ग्राम पंचायतीच्या स्थापनेपासून राहणारे ग्रामस्थ रायगड भूषण डॉ.जयपाल पाटील चेंढरे ग्रामपंचायतीचे भूषण आहेत त्यांचे प्रशिक्षण सर्वांच्या उपयोगाचे आहे याचा मला अभिमान आहे, असे विचार ग्रामपंचायतचे प्रशासक ज्ञानेश्वर साळगावकर यांनी पंचायतीच्या विशेष ग्रामसभेत काढले.

यावेळी ग्रामसेवक यांनी उपस्थित ग्रामस्थांना सांगितले की, डॉ. जयपाल पाटील यांनी पंचायतीच्या सर्व कर्मचारी व ग्रामस्थांना दोन वर्षांपूर्वी आपत्ती व सुरक्षेचे प्रशिक्षण दिले असून त्यांना महाराष्ट्र शासनाने आदिवासी सेवक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले असून हे दोन्ही पुरस्कार अलिबाग तालुक्यात प्रथमच त्यांना मिळाले आहेत आणि ते आमचे ग्रामस्थ आहेत. यानंतर प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी ग्रामस्थ व कर्मचारी यांना सांगितले की पावसाळा आता संपत आला आहे. त्यामुळे अपघात होऊन नुकसान होते या विजांची माहिति मिळण्यासाठी केंद्र सरकारने दामिनी ॲप तयार केला असून आपल्या मोबाईलवर तो मोफत डाउनलोड करून घ्यावा, इतरांनाही सांगावा असे त्यांनी यावेळी आवाहन केले.

आजच्या सभेत अनेक विकास कामांना मंजुरी दिल्याची माहिती उपस्थित त्यांना प्रशासक यांनी दिली सर्वांनी स्वच्छता पाळावी व सार्वजनिक कामे पंचायतीला सादर करावेत असे साळगावकर यांनी सांगितले. यावेळी शिरीष पाटील, श्रीहरी खरात, संध्या पालकर, संदेश गोसावी, संदीप शहा, अनिल जावकर, संजय जगे, अरुण देसाई, धनश्री पाटील, रूपाली आंबिटकर यांनी चर्चेत सहभाग घेतला.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मतदान यंत्र प्रशिक्षण

**। उरण । दिनेश पवार ।**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय महालण विभाग फुंडे येथे नेहमीच्या सार्वत्रिक निवडणुकानुसार विधानसभा निवडणूक निमित्ताने मतदान यंत्र प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळ व तहसील कार्यालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला.

निवडणुकीतील वापरले जाणारे मतदान यंत्र हे सुरक्षित आहे. त्यामध्ये आपण केलेले मतदान योग्य पद्धतीने नोंदवले जाते याबाबतची विश्वासार्हता मतदारांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने महाविद्यालयात नागरिकांना मतदान केंद्रातील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची कार्यपद्धती व त्याची उपयुक्तता याबाबत कविता माने यांनी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म हाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी महाविद्यालय दरवर्षी नियमितपणाने नव म तदारांची नोंदणी तसेच राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने व विविध निवडणुकांच्या काळातील राज्यशास्त्र व निवडणूक साक्षरता मंडळ द्वारे राबविण्यात आलेल्या मतदार जागृती अभियानाबाबतची माहिती उपस्थितांना दिली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र व निवडणूक साक्षरता मंडळाचे प्रमुख डॉ. संदीप घोडके यांनी तर आभार राष्ट्रीय सेवा योजनाचे प्रमुख राम गोसावी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता उपप्राचार्य डॉ. विलास महाले, डॉ. सोनवले, सांस्कृतिक प्रमुख डॉ. सुजाता पाटील, विद्यार्थी संसद प्रमुख गायकवाड व सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवकांनी अल्पावधीत कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मेहनत घेतली. विशेष म्हणजे उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी त्वरित मतदान यंत्र व प्रशिक्षक स्टाफ महाविद्यालयात उपलब्ध करून मोलाचे सहकार्य केले.

# तांबडी आदिवासी वाडी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**। पेण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव हद्दीतील आदिवासी बांधवांसाठी तांबडी आदिवासी वाडी येथे माणुसकी प्रतिष्ठान जितनगर, रॅलीज इंडिया लिमिटेड आणि टाटा केमिकल सोसायटी फॉर रुरल डेव्हलपमेंट यांच्या सहकार्याने ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्षे संतोष ठाकूर, डॉ. केतन ठोकळ, डॉ.मनिष पंचमुख, नेत्रतज्ञ, डॉ.आनन पाटील, संदीप जोशी, मानसी पाटील, केशर पाटील, राजेश रसाळ, राजू पाटील, उदय गावंड, सुनिल वाघमारे, गीता वाघमारे, नरेश कडू, महादेव शिद, यशवंत खाकर आदी मान्यवर उपस्थित होते.



**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस याद्वारे असे कळविण्यात येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, गाव धोकवडे येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांच्या खुद्द मालकीची आणि ताबे वहिवाटीची आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रूपये-पैसे) |
|---|---|---|---|
| ५५४ | १अ/२ | १-२०-६ | २-१९ |

आमचे अशिलांच्या वर नमूद मिळकतीच्या जवळ श्री. रमेश म्हात्रे यांच्या मालकीची गट नंबर ५५५, हिस्सा नंबर ४ ही वरकस मिळकत आहे. सदर गट नंबर ५५५/४ या मिळकतीच्या पश्चिम हद्दीलगत चार मीटर रुंदीचा जा-ये करण्याच्या रस्त्याचा निरंतरचा हक्क जमीनमालक श्री. रमेश म्हात्रे यांचे कडून मोबदल्यापोटी विकत घेण्याबाबत आमचे अशिलांची बोलणी चालू आहेत. सदर रस्त्याबाबत व्यवहार पूर्ण करण्याआधी गट नंबर ५५५/४ या मिळकतीच्या मालकी हक्काबाबत खातरजमा करण्याकरिता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

तरी मौजे धोकवडे येथील गट नंबर ५५५/४ या मिळकतीबाबत असणाऱ्या श्री रमेश म्हात्रे यांच्या मालकी हक्काबाबत अन्य कोणाचाही वाद अगर अन्य कोणताही मिळकतीच्या मालकी हक्कावर परिणाम करणारा हक्कसंबंध असल्यास आणि आमचे अशिलांना श्री रमेश म्हात्रे देत असलेल्या निरंतर रस्त्याबाबत कोणाचीही तक्रार असल्यास सदर व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध करणार वकिलांकडे लेखी हरकत नोंदवावी.

सदर मुदतीमध्ये कोणीही हरकत उपस्थित न केल्यास रमेश म्हात्रे यांच्या मालकी हक्काबाबत कोणताही वाद नाही असे गृहीत धरून आमचे अशील त्यांचे बरोबर वर नमूद केल्यानुसार जा-ये करण्याच्या निरंतरच्या हक्काबाबत नोंदणीकृत करार करतील व त्यानंतर येणारी कोणाचीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २०/१०/२०२४ सही/-

**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

# ९१ वर्षीय वृद्ध बेपत्ता; नागरिकांच्या मदतीचे आवाहन

**। वावोशी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यातील मौजे कारगाव येथील ९१ वर्षीय शंकर शिवराम मुसळे हे १४ ऑक्टोबर रोजी दुपारी २:३० वाजता साजगाव येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात देवदर्शनासाठी जातो, असे सांगून घरातून बाहेर पडले. मात्र, त्यानंतर ते अद्याप घरी परतले नाहीत. आज चार दिवस उलटूनही त्यांचा काहीच तपास लागला नाही.



शंकर मुसळे कुटुंबीयांनी आणि मित्रमंडळींनी सर्वत्र शोध घेतला, मात्र त्यांचा ठावठिकाणा लागत नसल्याने कुटुंबीयांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या घटनेचा तपास पोलीस अधिकारी गेंड करीत आहेत.

# एसटीपीकडून रस्ते पूर्ववत करण्यास सुरुवात

**। माथेरान । वार्ताहर ।**

दिवाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर मलनि:स्सारण प्रकल्प कामे पूर्ण करण्यासाठी कामाने वेग घेतला असून ज्या ज्या ठिकाणी बाजारपेठेत रस्त्यांची खोदाई पूर्ण करण्यात आली आहे. त्या भागातील रस्ते बुजवून पूर्ववत करण्यात येत आहेत.

चार महिने पावसाळ्यात ही कामे बंद करण्यात आली होती. त्यामुळे दसऱ्या नंतर या कामाना युद्धपातळीवर सुरुवात झाली आहे.खोदाई केल्यानंतर सर्व मातीचा उपयोग होण्यासाठी सुरक्षित ठिकाणी साठविण्यात येत आहे. लवकरच या रस्त्यावरील क्ले पेव्हर ब्लॉक लावण्यात येणार असून हे रस्ते पूर्ववत केले जाणार असल्याचे संबंधीत ठेकेदाराकडून सांगण्यात आले आहे. काही हॉटेलधारकांनी स्वतःच्या हॉटेलमध्ये एसटीपी प्लांट केला नसल्याने त्या हॉटेलचे सांडपाणी मुख्य रस्त्यावरील चेंबरमध्ये कचरा गोळा झाल्यास सर्व घाण परिसरात पसरल्याने दुर्गंधीचे प्रमाण दिसून यायचे. एसटीपी प्लांटमुळे गावात दुर्गंधी हद्दपार होणार असून स्वच्छता राखण्यास मदत होईल असे सुज्ञ, अभ्यासू नागरिक बोलत आहेत.



# १० लाखांची फसवणूक करणारे गजाआड

**। पनवेल । वार्ताहर ।**

चांगल्या परताव्याच्या गुंतवणुकीचे आमिष दाखवून नाव्हाशेवा येथील एका रहिवाशाना दहा लाखांचा गंडा घालणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळण्यात पनवेल सायबर सेलच्या पोलीस पथकाला यश आले आहे. सायबर सेलच्या पथकाने या फसवणुकीप्रकरणी दोन संशयित आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून १८ मोबाईल कार्ड, मोबाईल, तसेच आधारकार्ड जप्त केले आहे.योगेश जैन आणि हिमांशू सेन असे पकडलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.



फिर्यादीला सोशल मीडिया ॲप वरून नावाच्या महिलेने फिर्यादींना संपर्क करून चांगल्या परताव्याच्या गुंतवणुकीची माहिती देऊन, गुंतवणूक करण्यास भाग पाडले. नफ्याचे आमिष बघून फिर्यादी यांनी या महिलेने सांगितलेल्या वेबसाईटवरून त्याचे बँक खाते उघडून घेतले. दहा लाख चाळीस हजार चारशे बारा रुपये वेगवेगळ्या बँक खात्यात टाकून गुंतवणूक करण्यास सांगितले, या महिलेने सांगितलेल्या बँकेत पैसे देऊन फिर्यादी यांनी गुंतवणूक देखील केली. गुंतवणूक केल्यानंतर नफा कधी मिळणार यासाठी फिर्यादी हे फोनच्या माध्यमातून माहिती घेत हेते, मात्र काही दिवसानंतर फोन घेणे बंद झाले. यानंतर फसवणूक झाल्याचे त्यांना समजले.

या नंतर फिर्यादीने नाव्हाशेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. हा गुन्हा दाखल केल्यानंतर या गुन्ह्याचा तपास पनवेल सायबर सेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्याच्या पथकाने सुरू केला, तपास सुरू केल्यानंतर ज्या खात्यात पैसे भरण्यात आले आहेत, त्या बँकेतून खात्याची माहिती घेऊन गुन्ह्याचा तपास सुरू केला. हे बँक खाते वसई विरार परिसरातील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

वसई विरार मध्ये अशे बनावट बँक खाते बनवणारी टोळी असल्याची माहिती त्यांना मिळाली होती. या मिळालेल्या माहिती नुसार वरिष्ठ पोलीस नोरीक्षक दीपाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वृषाली पवार, पोलीस हवालदार प्रगती म्हात्रे, पोलीस शिपाई अतुल मोहिते, विकी भोगम तसेच अन्य पोलिस कर्मचारी यांनी वसई विरार येथील बँक खात्याच्या पत्यावर धाड मारली.

वसई विरार येथील शॉपमधून पोलिसांना ५२ वेगवेगळ्या बँकेचे क्रेडिट कार्ड, १८ मोबाईल कार्ड, १७ चेक बुक, १५ सिमकार्ड, ०८ आधारकार्ड, ०७ पॅनकार्ड, ०३ ड्रायव्हिंग लायसन्स, ०२ ओटर आयडी कार्ड, बनावट व्हिझिटिग कार्ड पोलिसांनी जप्त केले आहेत.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाचे मिळकतीबाबत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रभाकर वासुदेव म्हात्रे, रा. वडखळ, ता. पेण, जि. रायगड यांचेसोबत मिळकत खरेदी करण्याची बोलणी केलेली असुन सदर मिळकत कायम फरोक्त खरेदीखताने विकत घेण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे पेण, तालुका पेण, जि. रायगड येथील जुना सि.स.नं. ७१०, ७११, व ७१२ या मिळकतीवर उभ्या असलेल्या एकता सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पेण (जुनी न्यु पॅराडाईज बिल्डींग) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील बी-विंग, पहिल्या मजल्यावरील निवासी गाळा क्र. बी-१०७, क्षेत्र ५०० चौ. फुट बिल्टअप त्याचा नगरपालिका मालमत्ता क्रमांक PENN00002138 जुना मालमत्ता क्रमांक W4Z2002155 मॅन्युअल मालमत्ता क्रमांक 4/117 B.N.107C असा आहे ती मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदर मिळकत ही विद्यमान मालक श्री. प्रभाकर वासुदेव म्हात्रे यांचे खुद्द मालकीची, ताबेकब्जाची, वहीवाटीची, निर्वेध, बोजारहीत, विकण्यायोग्य असल्याची हमी त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणतेही भागावर श्री. प्रभाकर वासुदेव म्हात्रे यांचे व्यतिरीक्त इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबेकब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बक्षिस, बोजा, पोटगी, चार्ज, भाडेपट्टा, भागीदारी, खरेदीखत, या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधीतांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. या कालावधीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील नियोजीत व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
ता. २०/१०/२०२४

**ॲड. पुष्कर धनदास मोकल**
रा. ईशान्य बिल्डींग, बी-विंग, पहिला मजला,
फ्लॅट नं. १०३, महाजन हॉस्पिटलचे बाजुला,
चिंचपाडा, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८५०३६११७२, ७७७००९५८३३

# अवनी कोळीला ज्युनिअर, सिनियर डबल ट्रॅपमध्ये रौप्य

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

१५ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२४ दरम्यान बालेवाडी पुणे झालेल्या ३९ व्या महाराष्ट्र राज्य रायफल असोसिएशन आयोजित ट्रॅप व डबल ट्रॅप शॉटगन नेमबाजी स्पर्धे त कुमारी अवनी अलंकार कोळी हिने रायगड ज़िल्ह्याचे प्रतिनिधीत्व सिद्धांत रायफक व पिस्टल शूटिंग क्लब पनवेलतर्फे सहभाग घेऊन ज्युनिअर व सिनियर डबल ट्रॅपमध्ये वैयक्तिक सिल्वर मेडल पटकावले.



वर्ल्ड चॅम्पियन हिना सिद्धु व कॉमनवेल्थ गोल्ड मॅडलिस्ट रोनक पंडित यांच्या हस्ते पदक देऊन तिला सन्मानित करण्यात आले. तिने ह्या स्पर्धेत सर्वांना आश्चर्याचा धक्का देत रायगडकरांची मान सन्मानाने उंचावली. तिचे प्रशिक्षक रालस्टन आंतरराष्ट्रीय ज्युरी, किशन खारके राष्ट्रीय नेमबाज (रायगड भूषण )व अलंकार कोळी यांच्या मार्गदर्शनाने हे शक्य झाले, तसेच ती शिकत असलेल्या इंडियन मॉडेल स्कूल अँड जुनिअर कॉलेज उलवेच्या प्राचार्य गौरी शाह व कॉलेजचे संचालक यांनी तिचे या यशाबद्दल अभिनंदन करून पुढील राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना सदर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. दौलत लक्ष्मण कदम, २. सौ. प्रिया प्रमोद कदम रा. साई निती को. ऑप. हौसिंग सोसायटी, रुम नं.८, घर नं. १५८७, राममंदिराजवळ ब्राम्हण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

नगरपरिषद अलिबाग हद्दीतील सिटी सर्व्हे क्र. ७५० अे या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या साई निती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ब्राम्हण आळी अलिबाग या इमारती मधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र.८ क्षेत्र ३७१ चौ. फूट बिल्टअप (३४.४७ चौ.मी), अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. Z1BHA001908 मॅन्यूअल मालमत्ता क्र. १५८७/अ (१८.४५ चौ. मी.)

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २० दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग, सही/-
दि.२१.१०.२०२४

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## एमसीएच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत

# रायगडच्या संघाचा नांदेडवर दणदणीत विजय

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या चौदा वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगडच्या संघाने सलग दुसरा विजय मिळवला आहे. शनिवारी सोलापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल रेल्वे मैदानावर रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन विरूद्ध नांदेड जिल्हा क्रिकेट असोसिएशन चौदा वर्षाखालील मुलांचा साखळी फेरीतील दुसरा सामना खेळवण्यात आला. त्यामध्ये रायगडच्या संघाने एक डाव आणि १९ धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे.**



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारलेल्या रायगडच्या संघाने सर्व गडी गमावत १९१ धावा फलकावर नोंदवल्या. त्यामध्ये कर्णधार पृथ्वीराज जवके याने सर्वाधिक ३५, हर्षित सिंह ३४, विनय शिर्के ३१, श्रेय पाटील २४, तर पवन दामगुदे याने २० धावांचे योगदान संघाला दिले. नांदेड संघाचा पहिला डाव अवघ्या ६४ धावांवर आटोपला, रायगडकडून उदय जोहल याने ५ फलंदाजांना तंबूत धाडले तर दुसऱ्या बाजूने विनय शिर्के याने ३ गडी बाद केले. पहिल्या डावात १२७ धावांची आघाडी घेत रायगडने नांदेडच्या संघाला फॉलोऑन दिला होता. दुसऱ्या डावात सुध्दा नांदेडचा संघ ११० धावसांखेवर गडगडला. उदय जोहलने सुरेख गोलंदाजी करत दुसऱ्या डावात नांदेड संघाचे ३ मोहरे टिपले त्याला दुसऱ्या बाजूने अर्णव साळवीने ३, विनय शिर्के २, तर आदित्य भारतीने १ फलंदाज बाद करून साथ दिली. रायगडने एक डाव आणि एकोणीस धावांनी सामना जिंकत स्पर्धेतील सलग दुसरा विजय मिळवला.

रायगडच्या सलग दुसऱ्या विजयानंतर आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सर्व खेळाडूंचे व प्रशिक्षक विनय पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

## सावर्डे शाळेतील सात खेळाडूंचे यश

रत्नागिरी : डेरवण येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धेमध्ये निकम विद्यालयाच्या सात विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. विद्यालयातील खेळाडू स्वराज जोशी याने तीन हजार मीटर धावणे, पंधराशे मीटर धावणे आणि क्रॉसकंट्री स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. श्रेयश ओकटे याने चारशे मीटर धावणे या क्रीडाप्रकारात द्वितीय क्रमांक आणि चारशे मीटर अडथळा शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावला. अर्ष अडरेकर याने गोळाफेकमध्ये द्वितीय क्रमांक तर समृद्धी बामणेने उंच उडी क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. तिने चारशे मीटर धावणे व दोनशे मीटर धावणे क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला आहे. कुणाल म्हसकरने दोनशे मीटर धावणेमध्ये द्वितीय तर मुक्ता भुवडने चारशे मीटर धावणेमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. हुमेरा सय्यदने आठशे मीटर व पंधराशे मीटर धावणेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. अनुजा पवारने तीन हजार मीटर धावणेत प्रथम आणि १५०० मीटर धावणेत द्वितीय क्रमांक, तर ४*१०० रिलेमध्ये मुलीच्या संघाला तृतीय क्रमांक तर ४*४०० रिले मुलीच्या संघाला द्वितीय क्रमांक मिळाला.

## जान्हवी बनली, स्कूबा डायव्हिंग कोर्स संचालक



संग्रहित छायाचित्र

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था।**

मालवणची सुकन्या जान्हवी देवधर हिने भारत आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये सर्वात तरुण महिला स्कूबा डायव्हिंग कोर्स संचालक बनण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर मानांकित आणि स्कुबा डायव्हिंग प्रशिक्षकांची व्यावसायिक संघटना असलेल्या पेंडी या संस्थेत कोर्स डायरेक्टर होण्याचा जान्हवीचा प्रवास वयाच्या १६ व्या वर्षी तिचे मूळ गाव असलेल्या मालवण येथून सुरू झाला. तिची जिज्ञासा आणि समुद्रात खोलवर जाण्याच्या इच्छेमुळे, तिने तारकर्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्कूबा डायव्हिंग अँड क्वाटीक स्पोर्ट्स (इसदा) मधून स्कुबा डायव्हिंग प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कठोर प्रशिक्षण सुरू केले. जान्हवीने वयाच्या २० व्या वर्षी भारतातील सर्वात तरुण पँडी महिला विशेष प्रशिक्षकांपैकी एक म्हणून पहिला टप्पा गाठला.

पुढील प्रशिक्षण तिने दुबईमधून पूर्ण केले. आज जान्हवी सर्वात तरुण आणि पहिली महिला भारतीय पेंडी कोर्स डायरेक्टर म्हणून ओळखली जात आहे. स्कूबा डायव्हिंगचे प्रशिक्षण आणि इतर व्यक्तींना प्रमाणित करण्यासाठी ती आता खंबीरपणे तयार आहे. स्कुबा डायव्हिंगच्या क्षेत्रात महिलांचे कमी प्रतिनिधित्व पाहता जान्हवीचे हे यश विशेष लक्षणीय आहे. तीच्याकडून प्रेरणा घेऊन अन्य मुलींनी या क्षेत्रात येणे गरजेचे आहे.

### एसीसी इमर्जिंग टीम्स आशिया कप २०२४ स्पर्धा

# टीम इंडियाची विजयी सलामी

## ■ पाकिस्तानला पहिल्याच सामन्यात ७ धावांनी लोळवल

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात एसीसी इमर्जिंग टीम्स आशिया कप स्पर्धेतील पहिला सामना पार पडला. या सामन्यात भारताचा वरचष्मा दिसला. भारताने नाणेफेकीचा कौल जिंकताच प्रथम फलंदाजीला प्राधान्य दिलं. तसेच २० षटकात ८ गडी गमवून १८३ धावा केल्या आणि विजयासाठी १८४ धावांचं आव्हान ठेवलं. पाकिस्तानने २० षटकात ७ गडी गमवून १७६ धावा केल्या. हा सामना भारताने ७ धावांनी जिंकला. यासह स्पर्धेत भारताने विजयी सलामी दिली आहे.

भारताकडून अंशुल कंबोजने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. तर रसिखदार सलाम आणि निशांत सिंधूने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

भारताकडून अभिषेक शर्मा आणि प्रभसिमरन सिंगने आक्रमक सुरुवात करून दिली. पॉवर प्लेमध्ये या जोडीने ६८ धावा ठोकल्या. अभिषेक शर्मा २२ चेंडूत ३५ धावा करून बाद झाला. त्याने ५ चौकार आणि २ षटकार मारले. तर प्रभसिमरनने १९ चेंडूत ३ चौकार आणि ३ षटकाराच्या मदतीने ३६ धावा केल्या.

त्यानंतर कर्णधार तिलक वर्माने आक्रमक खेळी केली. दोन चौकार आणि दोन षटकार मारत ४४ धावा केल्या. त्याला नेहल वढेराची साथ मिळाली. त्याने २२ चेंडूत २५ धावा केल्या. या व्यतिरिक्त इतर फलंदाज काही खास करू शकले नाहीत. आयुष बदोनी फक्त २ धावा करून बाद झाला. अंशुल कंबोजला तर खातंही खोलता आलं नाही.

### कसं आहे स्पर्धेचं स्वरूप

**एसीसी इमर्जिंग टीम्स आशिया कप २०२४ स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेत एकूण ८ संघ उतरले आहेत. अ गटात बांग्लादेश, अफगाणिस्तान, श्रीलंका आणि हाँगकाँग हे संघ आहेत. तर ब गटात भारत, पाकिस्तान, युएई आणि ओमान हे संघ आहेत. प्रत्येक संघ साखळी फेरीत तीन सामने खेळणार आहे. त्यानंतर टॉप २ संघांची उपांत्य फेरीत वर्णी लागणार आहे. उपांत्य फेरीचे सामने २५ ऑक्टोबरला होणार आहेत. तर अंतिम फेरीचा सामना २७ ऑक्टोबरला होणार आहे.**

### दोन्ही संघाची प्लेइंग ११

पाकिस्तान ए (प्लेइंग इलेव्हन): हैदर अली, मोहम्मद हरिस, यासिर खान, ओमेर युसूफ, कासिम अक्रम, अब्दुल समद, अराफत मिन्हास, अब्बास आफ्रिदी, मोहम्मद इम्रान, जमान खान, सुफियान मुकीम.

इंडिया ए (प्लेइंग इलेव्हन): अभिषेक शर्मा, प्रभसिमरन सिंग , रमणदीप सिंग, अंशुल कंबोज, टिळक वर्मा, आयुष बडोनी, नेहल वढेरा, निशांत सिंधू, राहुल चहर, रसिक दार सलाम, वैभव अरोरा

# रोहित शर्माच्या नावावर लाजिरवाण्या विक्रमाची नोंद

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



हिटमॅन रोहित शर्माच्या नावावर आता एका लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे. रोहित शर्माच्या नावावर नोंदवला गेला लाजिरवाणा विक्रम म्हणजे न्यूझीलंडचा हा भारतीय भूमीवरील कसोटीतील तिसरा विजय हो. या कसोटीपूर्वी न्यूझीलंडने ३६ वर्षांपूर्वी म्हणजे १९८८ मध्ये भारतीय भूमीवर कसोटी सामना जिंकला होता. त्यानंतर आता न्यूझीलंडने विजय मिळवला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाला ८ विकेट्सनी लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले. भारताने न्यूझीलंडला विजयासाठी १०७ धावांचे लक्ष्य दिले होते. ज्याचा त्यांनी सहज पाठलाग केला. या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मानेनाणेफेकजिंकूनप्रथमफलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जो पूर्णपणे चुकीचे ठरला. भारतीय संघ पहिल्या डावात अवघ्या ४६ धावांत सर्वबाद झाला होता. येथूनच टीम इंडिया या सामन्यात मागे पडली. या पराभवासह रोहित शर्माला आणखी एक धक्का बसला. भारताने हा सामना हरताच रोहितच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रम नोंदवला गेला आहे. तो तिसरा भारतीय कर्णधार बनला आहे. ज्याच्या नेतृत्वाखाली भारताने घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध कसोटी सामना गमावला आहे. रोहितच्या अगोदर दिलीप वेंगसरकर आणि मन्सूर अली खान पतौडी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर कसोटी सामन्यात पराभूत झाले. न्यूझीलंड संघाने भारतीय भूमीवर ३८ कसोटी सामने खेळले आहेत. ज्यात तीन जिंकले आहेत आणि १७ कसोटी सामने गमावले आहेत. त्याचबरोबर १७ कसोटी सामने अनिर्णित राहिले आहेत. तसेच रोहितच्या नेतृत्वाखाली भारताने मायदेशात १४ पैकी ३ सामने गमावले आहेत. भारतीय संघाने दुसऱ्या डावात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला होता. आघाडीचे सर्व फलंदाज लयीत दिसत होते. यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मा यांनी संघाला शानदार सुरुवात करून दिली होती. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केली. सर्फराझ खानने दमदार शतक झळकावत १५० धावांची खेळी साकारली. ऋषभ पंतने दमदार फलंदाजी केली. त्याने ९९ धावा केल्या. रोहित-विराटनेही अर्धशतकी खेळी साकारली होती. अशा प्रकारे भारतीय संघाने दुसऱ्या डावात ४६२ धावा कुटल्या होत्या. ज्यामुळे भारताने १०७ धावांचे लक्ष्य न्यूझीलंड संघाला दिले होते.

## सिंधूची घोडदौड उपांत्यपूर्व फेरीत खंडित

**। ओडेन्स । वृत्तसंस्था ।**



भारताची अनुभवी बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूची डेन्मार्क खुल्या स्पर्धेतील घोडदौड उपांत्यपूर्व फेरीत खंडित झाली. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक मिळवणाऱ्या जॉर्जिया टुनजुंगने सिंधूचा प्रतिकार २१-१३, १६-२१, २१-९ असा मोडीत काढला. जागतिक क्रमवारीत आठव्या स्थानावर असणाऱ्या इंडोनेशियाच्या टुनजुंगला यापूर्वी सिंधूविरुद्ध झालेल्या १२ लढतीमध्ये केवळ दोनच विजय मिळवता आले होते. या वेळी तिने तिसऱ्या विजयाची भर घातली. सिंधूने दुसरा गेम जिंकून रंगत आणली असली, तरी पूर्ण लढतीत टुनजुंगचे वर्चस्व दिसून आले. उपांत्य फेरीत आता टुनजुंगची कोरियाच्या अव्वल मानांकित ॲन से यंगशी गाठ पडेल. सिंधूविरुद्ध टुनजुंगने कमालीच्या वर्चस्वाने खेळ केला. सलग आठ गुणांची कमाई करून तिने पहिला गेम अगदी सहज जिंकला. दुसऱ्या गेममध्ये सिंधूने कामगिरी उंचावली. आक्रमक खेळ करत तिने ६-१ अशी आघाडी घेतली होती.

# भारताचा ‘विक्रम’ थोडक्यात बचावला

## झिम्बाब्वेने उभारली सेशेल्सविरूध्द तिसरी सर्वाधिक धाव संख्या

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

झिम्बाब्वे क्रिकेट संघाने ट्वेंटी-२० मध्ये इतिहास रचला आहे. झिम्बाब्वेने सेशेल्सविरूद्ध ट्वेंटी-२० मध्ये तिसरी सर्वाधिक धावसंख्या उभारली. नुकत्याच झालेल्या भारत बांगलादेश ट्वेंटी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात भारताने बांगलादेशविरूद्ध २९७ धावा केल्या व ट्वेंटी-२० मध्ये सर्वाधिक धावा करणारा भारत दुसरा संघ ठरला. तर झिम्बाब्वेने २८ चौकार १८ षटकारांच्या मदतीने सेशेल्सविरूद्ध २८७ धावा करून ट्वेंटी-२० सर्वाधिक धावांच्या यादीत तिसरे स्थान मिळवले आहे.



सेशेल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि झिम्बाब्वेने सामन्याची सुरूवात स्पोटक फलंदाजीने केली. ब्रायन बेनेट व तडीवानाशे मरुमणीने पहिल्या विकेटसाठी तब्बल १४२ धावांची भागिदारी केली. पण, दहाव्या षटकात मरुमणी झेलबाद होवून परतला आणि भागिदारी तुटली. मरुमणीने १० चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ३७ चेंडूत ८६ धावा केल्या. त्यानंतर १३ व्या षटकात ब्रायन बेनेट माघारी परतला आणि ९ धावांनी त्याचे शतक हुकले. २० षटकांच्या अखेरीस झिम्बाब्वे २८६ धावांचा टप्पा गाठला. त्या धावांचा पाठलाग करताना सेशेल्सने ६ षटकांमध्ये २ विकेट्स गमावल्या त्यांनी केवळ १८ धावा केल्या होत्या. त्यानंतर ७ व्या षटकात पावसाने हजेरी लावली. डकवर्थ-लुईस-स्टर्न पद्धतीनुसार झिम्बाब्वे संघाला ७६ धावांनी विजयी घोषित करण्यात आले.

# भारत-पाकिस्तान सामन्यात राडा



## अभिषेक शर्माकडून चोख प्रत्युत्तर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत-पाकिस्तान या हायव्होल्टेज सामन्याची चाहत्यांना कायमच आतुरता असते. याचदरम्यान सध्या सुरू असलेल्या इमर्जिंग आशिया कप २०२४ मध्ये या दोन्ही संघांमध्ये एक रोमांचक सामना पाहायला मिळाला. या सामन्यात दोन्ही संघांचे एकापेक्षा एक जबरदस्त खेळाडू होते. दरम्यान भारतीय संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारताकडून विस्फोटक फलंदाज अभिषेक शर्मा आणि प्रभसिमरन सिंह हे सलामीसाठी उतरले. दरम्यान अभिषेक शर्मा आणि पाकिस्तानी गोलंदाज मैदानावर भिडताना पाहायला मिळाले.

भारत-पाकिस्तान सामन्यात अभिषेक शर्माने २२ चेंडूत ५ चौकार व २ षटकारासह ३५ धावांची खेळी केली. प्रभसिमरन सिंहच्या साथीने त्याने पॉवरप्लेमध्ये ६८ धावा केल्या. अभिषेक शर्माची विस्फोटक फलंदाजी पाहून पाकिस्तानी गोलंदाज चांगलेच गडबडले होते. पॉवरप्लेनंतर पाकिस्तानकडून सुफियान मुकीम गोलंदाजीला आला. सुफियान मुकीमने त्याच्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर अभिषेक शर्माला बाद केले. तो बाद होताच पाकिस्तानी गोलंदाजाने अभिषेक शर्माला त्याच्या ॲक्शनमधून मैदान सोडण्याचे संकेत दिले. जे अभिषेक शर्माला आवडले नाही. याशिवाय पाकिस्तानी क्षेत्ररक्षकही काहीतरी बोलताना दिसले. अभिषेक शर्मा शांतपणे पॅव्हेलियनच्या दिशेने जात होता. मात्र, तो अचानक थांबला आणि त्याने पाकिस्तानी खेळाडूंना प्रत्युत्तर दिले. पंचमध्ये आल्यानंतर अभिषेक शर्माने जाताना रागात एक कटाक्षटाकला. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात सलामीवीर अभिषेक शर्मा आणि प्रभसिमरन सिंह यांनी चांगलीच फटकेबाजी केली. दोघांनी मिळून सामन्याच्या सहाव्या षटकात खोऱ्याने धावा केल्या. या सामन्याच्या सहाव्या षटकात दोघांनी मिळून २५ धावा करत गोलंदाजांवर दबाव टाकला होता.

### आयपीएल २०२५ जिओवर दिसणार नाही

# हॉटस्टारवरुन होणार सामन्यांचे प्रक्षेपण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**काही वर्षांपूर्वी रिलायन्सच्या जिओ सिनेमाने भारताचे क्रिकेट सामने, अन्य खेळांच्या प्रसारणाचे हक्क मिळविले होते. त्यामुळे डिस्ने हॉटस्टारची असलेली सद्दी संपली होती. यानंतर आयपीएलसह बहुतांश क्रिकेट सामने हे जिओ सिनेमावरून प्रसारित होत आहेत. परंतू, आता जिओ सिनेमा ॲपही मागे पडणार आहे.**




२०२५ पासून दुसऱ्याच ॲपवरून आयपीएलसह अन्य क्रिकेट, खेळांचे सामने प्रसारित केले जाणार आहेत. रिलायन्स आणि डिस्नेने एकत्र येत एक कंपनी बनविली आहे. या कंपनीने आयपीएल २०२५ सारख्या क्रीडा स्पर्धा आणि अन्य स्पोर्ट्स इव्हेंट्स जिओ सिनेमावर न दाखविण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनी पुन्हा एकदा सर्व क्रिकेट सामने, खेळांचे प्रसारण डिस्ने हॉटस्टारवर घेऊन जाणार आहे, असे वृत्त रॉयटर्सने दिले आहे. भारतातील क्रिकेट सामन्यांचा प्रसारणाचा हक्क हा जिओ सिनेमाकडे आहे. तर आयसीसीच्या सामन्यांच्या प्रसारणाचा हक्क डिस्ने हॉटस्टारकडे आहे. भारत ही क्रिकेटची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. ही बाजारपेठ रिलायन्सकडे गेल्याने हॉटस्टारला मोठा धक्का बसला होता. यानंतर हॉटस्टार भारतातील बिझनेस विकण्याच्या तयारीत आहे, असे वृत्तही पसरले होते. आता रिलायन्स आणि डिस्ने हॉटस्टारच एकत्र आले आहेत. या दोन कंपन्यांनी फेब्रुवारीत मिळून एक कंपनी बनविली आहे. या कंपनीचे बाजारमुल्य ७१ हजार ४५५ कोटी रुपये आहे. या कंपनीकडे १२० टीव्ही चॅनल्स आणि दोन स्ट्रिमिंग सर्व्हिस आहेत. कंपनीने सर्व क्रिकेटचे सामने हॉटस्टारवार दाखविण्याच्या वृत्तावर काही अधिकृत खुलासा केलेला नाही.

डिस्नेप्लस हॉटस्टारकडे लाईव्ह स्ट्रिमिंग करण्याचे चांगले तंत्रज्ञान आहे. तसेच ते टार्गेटेड जाहिरातही करू शकतात. त्यामुळे रिलायन्सने हा निर्णय घेतला असावा असा अंदाज लावला जात आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)